दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३४५ | रविवार दि.२३ ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily | Marathi | Year-6th | Issue-345 | Sunday, Dt.23 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# एआयच्या माध्यमातून महिलांनी सक्षमीकरणाची नवी संधी साधावी - विजया रहाटकर

## ‘यशोदा एआय’ कार्यशाळेत डिजिटल कौशल्य, रोजगार, व्यवसाय आणि सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय आणि दैनंदिन जीवनात प्रगती करण्यासाठी अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. महिलांनी एआयचे स्वरूप समजून घेऊन त्याचा विवेकपूर्ण वापर करावा आणि या तंत्रज्ञानाला सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनवावे, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘यशोदा एआय’ उपक्रमांतर्गत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला’ विषयावर आयोजित क्षमता बांधणी कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह, उपसचिव डॉ. पद्मश्री बेनाडे, उपायुक्त कृष्णा राठोड, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी कोमल कोरे, व्याख्याते उन्मेष जोशी, स्मिता कासार आदी उपस्थित होते.

‘एआय सखी’च्या माध्यमातून डिजिटल सक्षमीकरणाची साखळी

विजया रहाटकर म्हणाल्या की, एआय ही भविष्यातील नव्हे तर वर्तमानातील गरज आहे. महिला उद्योजक, बचत गटातील महिला आणि गृहिणींनीही एआयचा उपयोग व्यवसायवृद्धी, डिजिटल मार्केटिंग, माहिती संकलन, दैनंदिन नियोजन आणि शिक्षणासाठी करावा. मात्र एआयचा वापर करताना विचारशक्ती कायम ठेवण्याबरोबरच गोपनीयतेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.




डीपफेक, आवाजाची नक्कल, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, बनावट खाती आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर यापासून महिलांनी सावध राहावे. ‘एआय सखी’च्या माध्यमातून एक महिला एआय शिकून इतर महिलांना शिकवेल आणि डिजिटल सक्षमीकरणाची साखळी निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### सायबर सुरक्षेबाबत दक्ष राहण्याचे आवाहन

सुदीप जैन यांनी एआयचा प्रसार अत्यंत वेगाने होत असून त्यातील धोके समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. एआयच्या माध्यमातून हुबेहूब आवाज व चित्रफिती तयार करून फसवणूक होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही संशयास्पद संदेश, आवाज किंवा चित्रफितीवर तत्काळ विश्वास न ठेवता त्याची खात्री करावी, असे त्यांनी सांगितले.

अमोल येडगे यांनी एआय हे महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच सुरक्षेसाठीही प्रभावी साधन असल्याचे सांगून महिलांनी आत्मविश्वासाने तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, असे आवाहन केले.

नंदिनी आवाडे यांनी ‘यशोदा एआय’च्या माध्यमातून विद्यार्थिनी, गृहिणी, उद्योजिका आणि प्रौढ महिलांपर्यंत एआयचे ज्ञान पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.

कार्यशाळेत स्मिता कासार यांनी दैनंदिन जीवनातील एआयचा वापर, उन्मेष जोशी यांनी सायबर सुरक्षा, दिपाली श्रीवास्तव यांनी ‘पॉश’ जनजागृती, तर शिवम गर्ग यांनी डिजिटल मार्केटिंगविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला.



# पावसाच्या खंडाने पूर्णा तालुक्यात पिके करपली शेतकरी हवालदिल..!

## सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीदसह पिकांचे नुकसान, २५ टक्के पीकविमा अग्रिम देण्याची शिवसेना उबाठाची मागणी

पूर्णा । प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यात पावसाने दीर्घ खंड दिल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद व हळद या पिकांवर मोठा परिणाम झाला असून, विशेषतः वझुर व चुडावा सर्कलमधील हलक्या व खडकाळ जमिनीवरील पिके वाळून करपली आहेत. कर्ज व उसनवारी करून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

या पार्श्वभूमीवर दि. २१ ऑगस्ट रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने संयुक्त पंचनामे करून पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना २५ टक्के पीकविमा अग्रिम मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली.पूर्णा तालुका कोरडादुष्काळग्रस्त घोषित करून प्रति हेक्टर योग्य आर्थिक मदत द्यावी. पंचनामे व मदतीस विलंब झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.निवेदनावर तालुकाप्रमुख छगनराव मोरे, उपतालुकाप्रमुख गोविंदराव काळे, मंचकराव जोगदंड, खुशाल भोसले, दत्तराव पवार, पवन जोगदंड, विठ्ठल शिंदे, अशोक ढोणे, बाळू पवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खांडेपारगाव शिवारात गुटखा तस्करीवर एलसीबीचा छापा

## ८.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त,इनोव्हा कारसह विविध कंपन्यांचा गुटखा जप्त

### एक संशयित पोलिसांच्या ताब्यात, दुसरा फरार

बीड । प्रतिनिधी

अवैध गुटखा वाहतुकी विरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) धडक कारवाई करत मौजे खांडेपारगाव शिवारात इनोव्हा कारमधून वाहतूक केला जात असलेला विविध कंपन्यांचा गुटखा जप्त केला. या कारवाईत गुटखा व इनोव्हा कार असा एकूण ८ लाख ५५ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दि. २१ ऑगस्ट रोजी एलसीबीचे पथक अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करीत असताना, पिपळनेर-बीड मार्गावरून पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार गुटखा घेऊन बीडकडे येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने पथकाने सापळा रचला.

दरम्यान, उमरी ते खांडेपारगाव जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर संशयित इनोव्हा कार क्रमांक एमएच १२ जीझेड १९५२ आढळून आली. पोलिसांनी कारवर छापा टाकला असता पुढील सीटवर असलेल्या दोघांपैकी एकाने वाहन थांबताच शेतात पळ काढला, तर दुसरा इसम पोलिसांच्या

पान २ वर....





बीड - दैनिक प्रजापत्रचे कार्यकारी संपादक मंगेश निटूरकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी. यावेळी दैनिक प्रजापत्रचे संपादक संजय मालानी यांच्यासह नंदूकुमार पांडव, इतर मान्यवर.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5




दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती

स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील ‘दै.समर्थ राजयोग’ चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही ‘वर्धापन दिन विशेषांक २०२६’ चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/- |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/- |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/- |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/- |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............./- रोख/चेक/डी.डी./ ऑनलाईन जमा करत आहे.
जाहिरातदाराचे नाव :
गाव : तालुका : जिल्हा :
मो.नं. :
₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com
जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
बँक खाते : दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त
दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६
गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!
सहभागाकरीता नम्र आवाहन
प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६
शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.
वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक
पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी
1. दिव्यांग शाळा व संस्था :
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
निकष:
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.
2. सामान्य शाळा वर्गवारी:
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
निकष:
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.
प्रस्तावासोबत जोडायची माहिती:
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.




आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सॲप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

संपादकीय....

## अनंत काळपर्यंत शब्दांमध्ये राहू

आम्ही सोमैया विद्याविहार विद्यापीठात आयोजित केलेल्या चर्चसत्रात कवी डॉ. नरेंद्र पुंडरीक यांच्या कविता आणि कवी म्हणून ऐकण्याचा योग आला. साहित्य समजून घेताना आपला भाषिक अवकाश विस्तारत जाणे,नेहमी पूरक ठरते. पुंडरीक हे उत्तर प्रदेशमधील बांदा इथले कवी.हिंदीत त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या मते कवीच्या हाती कविता एका शस्त्रासारखी असते, जी माणसाला जागवेल आणि योग्य रस्ता दाखवेल. कवी कवितेच्या माध्यमातून केवळ निसर्गाचे चित्रण किंवा कल्पनेचे निरूपण करत नाही. कविता माणसाचे सुख-दुःख, संघर्ष आणि समाज वास्तव समोर ठेवते. '' १९५३ - ५४ च्या आसपास उत्तर प्रदेशमधील बांदा येथे जन्मलेला हा कवी, समीक्षक आणि संपादक. त्यांची कविता लोक जीवनाशी दृढपणे जोडली गेली आहे. त्यांची कविता निव्वळ फँटसी नाही ती बाजारीकरणाच्या विरोधात उभी राहून सामान्य माणसांची बाजू घेते. त्यांच्या एका कवितेत त्यांनी म्हटले आहे, असे म्हटले जायचे की वाचन - लेखन माणसाला अधिक चांगला माणूस बनवते. पण आता माणसांची ओळख कपड्यांवरुन होते. जितके चांगले कपडे तितका माणूस चांगला असे लोक समजायला लागतात. कृत्रिम पोशाखी सभ्यतेचे चित्र थेटपणे पुंडरीक रंगवतात.

त्यांच्या आणखी एका कवितेतला आशय मला भावला. त्या कवितेत आवश्यक गोष्टींमध्ये गहू, तांदूळ, छत, दरवाजा यांचा समावेश ते करत नाहीत. मात्र 'एक अशी खिडकी जिच्यातून मोकळे आकाश दिसेल 'ती त्यांना आवश्यक गोष्ट वाटते. अनेक अर्थांनी विकास, विशालता, निरभ्र मोकळपणा, विस्तीर्णता हे संदर्भ आकाशाशी जोडले आहेत. पुंडरीक यांच्या आणखी एका कवितेबद्दल बोलणे आवडेल मला.

दैनिक समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनानिमित्त...

## हेलन केलर राज्यस्तरीय दिव्यांग आदर्श संस्था चालक सेवा गौरव पुरस्कार शिवाजी चव्हाण यांना जाहीर...!.

बीड /प्रतिनिधी

राजे संभाजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था दगडी शहाजानपूर या संस्थेचे सचिव शिवाजी गोविंदराव चव्हाण यांच्या दिव्यांग सेवेची दखल घेऊन दैनिक समर्थ राजयोगच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय हेलन केलर दिव्यांग आदर्श संस्थाचालक सेवा गौरव पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे.

दैनिक समर्थ राजयोग आपल्या वर्धापन दिनानिमित्त मागील सहा वर्षापासून शिक्षक दिनाचे औचित्य साधत दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्षित वंचित असलेल्या घटकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करत आहे. यावर्षी बीड जिल्ह्यातील दिव्यांग संस्था, संस्थेतील आदर्श शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच दिव्यांगांची प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

यावर्षी हेलन केलर राज्यस्तरीय दिव्यांग आदर्श संस्थाचालक सेवा गौरव पुरस्कार २०२६ चे मानकरी ठरले आहेत राजे संभाजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था दगडी शहाजानपूर तालुका जिल्हा बीडचे सचिव श्री शिवाजी गोविंदराव चव्हाण.

बीड शहरामध्ये या संस्थेची विठ्ठल रुक्माई मतिमंद निवासी विद्यालय ही दिव्यांगांची विशेष शाळा कार्यरत आहे.संस्थेने शाळेच्या



माध्यमातून खरी कमाई करणे, सांस्कृतिक व कला क्रीडा महोत्सवामध्ये उत्तम कामगिरी करण्याबरोबरच दिव्यांग विद्यार्थ्यांकरता विविध उपक्रम राबवणे यासह या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी स्मृतिचिन्ह, सेवा गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, झाड भेट देऊन फेटा बांधून सर्वांच्या उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि कार्यकारी संपादक शेख आयेशा यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ मध्ये बीडचा झेंडा, डॉ. कविता गित्ते यांची निवड

### देशभरातील ४८ शिक्षकांमध्ये महाराष्ट्रातील चार मानकरी,५ सप्टेंबरला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश असून बीड जिल्ह्यातील डॉ. कविता नृसिंहराव गित्ते यांची निवड झाल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात कार्यरत असलेल्या डॉ. कविता गित्ते यांनी दिव्यांग, ऊसतोड कामगारांची मुले तसेच वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापन करताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखण्यासाठीही त्यांनी प्रभावी प्रयत्न केले.

महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा गौरव...

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून डॉ. कविता नृसिंहराव



गित्ते (बीड), कुंदा जयवंत बच्छाव (नाशिक), वैभव वसंतराव कुलकर्णी (लातूर) आणि शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा) यांची निवड झाली आहे.

कुंदा बच्छाव यांनी नाशिक महानगरपालिका शाळा क्र. १८मध्ये विविध अभिनव उपक्रम राबविले. वैभव कुलकर्णी यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान व कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला. तर शिवप्रसाद टिंगरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण व देशसेवेची भावना रुजविण्यासाठी योगदान दिले.

तीन टप्प्यांत झाली निवड...

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया राबविण्यात आली. नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास, शाळेची गुणवत्तावाढ आणि वंचित घटकांसाठी केलेले कार्य या निकषांवर अंतिम ४८ शिक्षकांची निवड करण्यात आली.

५ सप्टेंबरला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार...

शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या कार्यावर आधारित लघुपटही यावेळी प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

## निपाणी टाकळी ग्रामपंचायतीत अनियमिततेचे आरोप..!

### मासिक सभा, इतिवृत्त नोंदवही, जयंती कार्यक्रम अन् विकासकामांबाबत चौकशीची मागणी



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी ग्रामपंचायतीमध्ये मागील काही महिन्यांपासून मासिक सभा नियमितपणे न घेणे, ग्रामपंचायत कार्यालयातील उपस्थिती तसेच कथित बोगस कामांच्या बिलांबाबत अनियमितता होत असल्याचा आरोप उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण सर्जेराव चव्हाण यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे.

चव्हाण यांच्या तक्रारीनुसार, एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी मासिक सभा घेतल्या नसल्याचा आरोप आहे. ६ ऑगस्ट रोजी सभा झाली. मात्र इतिवृत्त नोंदवहीतील नोंदी, मागील सभेची माहिती व कोरी ठेवलेली पाने याबाबत समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

इतिवृत्त नोंदवहीतील काही पाने कोरी ठेवून नंतर सह्या घेण्यात आल्याचा आरोप करत भविष्यात खोटे ठराव करून बोगस कामे दाखविण्याची शक्यता असल्याची भीती चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. यासंदर्भातील प्रोसीडिंग बुकची रेकॉर्डिंग व नोटीस बुकचे फोटो आपल्याकडे असल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

तसेच विविध महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांना सरपंच व ग्रामविकास अधिकारी उपस्थित राहत नसल्याचा, तर ग्रामविकास अधिकारी बीड येथे वास्तव्यास असून नियमित कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. कचरा कुंड्यांच्या खरेदीच्या बिलांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची मागणी लक्ष्मण सर्जेराव चव्हाण यांनी केली आहे.

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५७८**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- १८/०८/२०२६**

### जाहिरनामा

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- शिरीन अजीम शेख

प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १८६२ न.प.घर नं.१४-९९/उ/५ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१४-९९/उ/५ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला --------------------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा:
पुर्व :- शेख अकबर यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- शेख निहाल शेख बखतर पटेल यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा
उत्तर :- अक्रम युनूस सय्यद यांची जागा

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४७/२०२६**
**शेवंताबाई भ्र. चत्रभुज देवकते व इतर वि. निरंक**
**(मार्फत - अँड. आर.ए. कोळेकर)**

ज्याअर्थी मयत नामे चत्रभुज पि. बाबासाहेब देवकते, रा. रेवकी ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १३/०३/२०२३ रोजी रेवकी ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ शेवंताबाई भ्र. चत्रभुज देवकते, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ साहेबराव पि. चत्रभुज देवकते, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ आश्राबाई भ्र. गंगाराम चोरमले, वय ५४ वर्षे, धंदा रेवकी, रा. रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ केसर भ्र. अंकुश काळे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. ठाकर आडगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५ सिताबाई भ्र. बाबासाहेब चोरमले, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता. गेवराई जि.बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत चत्रभुज बाबासाहेब देवकते यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १४/१०/२०२६

**स्वाक्षरित/-** **क.लिपीक** — (शिक्का) — **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४०/२०२६**
**भगवान पि.रामचंद्र बांगर वि.निरंक**
**मार्फत -ॲड.ए.बी.बांगर, गेवराई**

अर्जदार १. भगवान पि. रामचंद्र बांगर वय ७० वर्षे, धंदा शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

२. रघुनाथ पि. रामचंद्र बांगर वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

३. वसंत पि. रामचंद्र बांगर वय ६२ वर्षे, धंदा - शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

४. प्रभाकर पि. रामचंद्र बांगर वय ५५ वर्षे, धंदा - शेती रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत रामचंद्र पि. माणिकराव बांगर हे/हया अनुक्रमे दिनांक १६/०४/२०२१ रोजी उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रामचंद्र पि. माणिकराव बांगर, रा. उक्कडपिंपरी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०१/१०/२०२६

**स्वाक्षरित/-** **क.लिपीक** — (शिक्का) — **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ नागरी अर्ज क्रमांक ६३८/२०२६**
**मंदाबाई भ्र. सखाराम पुंड वि. निरंक**
**मार्फत - ॲड.आर.ए.कोळेकर, गेवराई**

अर्जदार
१. मंदाबाई भ्र. सखाराम पुंड
वय ५८ वर्षे, धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड
२. परमेश्वर पि. सखाराम पुंड वय ३९ वर्षे,
धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड
३. शरद पि. सखाराम पुंड वय ३० वर्षे,
धंदा - शेती रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत सखाराम पि. ठकुबा पुंड हे/हया अनुक्रमे दिनांक ११/१०/२०१८ रोजी रेवकी, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सखाराम पि. ठकुबा पुंड, रा. रेवकी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः ०१/१०/२०२६

**स्वाक्षरित/-** **क.लिपीक** — (शिक्का) — **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई**

## २५ वर्षांनंतर प्रकाश तिवारींच्या आयुष्यात पुन्हा उमलले आशेचे किरण.!

### मळणी यंत्रात हात गमावलेल्या तिवारींना आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून १.७५ लाखांचा अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात



पाटोदा । प्रतिनिधी

बालवयात मळणी यंत्रात हात अडकून खांद्यापासून हात गमावलेल्या डोमरी येथील प्रकाश गंगाराम तिवारी यांच्या आयुष्यात तब्बल २५ वर्षांनंतर आनंदाचा क्षण आला. आष्टी येथे लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आयोजित महाआरोग्य शिबिराच्या प्रयत्नातून त्यांना १ लाख ७५ हजार रुपये किमतीचा अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात मोफत मिळाला. पुणे येथील इनाली फाउंडेशन, दाभाडे (तळेगाव) येथे २२ ऑगस्ट रोजी हा हात यशस्वीपणे बसवण्यात आला.

लहानपणी झालेल्या अपघातानंतर प्रकाश तिवारी यांनी अनेक वर्षे अपंगत्वाशी संघर्ष केला. आर्थिक अडचणींमुळे अत्याधुनिक कृत्रिम हात मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न अपूर्ण राहिले. मात्र ५ ऑगस्ट रोजी आष्टी येथे झालेल्या महाआरोग्य शिबिराने त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली.

शिबिरात तिवारी यांची तपासणी व नोंदणी करण्यात आली. गणप्रमुख राजेंद्र भोंडवे, पोपट कोल्हे व ग्रामस्थांनी त्यांना शिबिरात आणले होते. पुढील प्रक्रियेसाठी त्यांना इनाली फाउंडेशनमध्ये पाठविण्यात आले.

आमदार सुरेश धस यांनी रुग्ण मदत विभागाचे स्वीय सहाय्यक ड. महेश बेदरे व पाटोदा येथील स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांना आवश्यक पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार ड. बेदरे यांनी इनाली फाउंडेशनचे अभिषेक सर यांच्याशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण केली.

साधा नव्हे, अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक हात.!

प्रकाश तिवारी यांना मिळालेला हा इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात स्विचद्वारे कार्यरत असून, नियमित वापरानुसार साधारण तीन दिवसांतून एकदा चार्ज करता येतो. या हाताच्या मदतीने सुमारे पाच किलोपर्यंत वजन उचलणे, घरातील दैनंदिन कामे तसेच काही शेतीची कामे करणे शक्य होणार आहे.

पंचवीस वर्षांनंतर माझ्या आयुष्यात पुन्हा आनंदाचा क्षण आला. हा हात माझ्यासाठी केवळ कृत्रिम अवयव नसून नव्या आयुष्याची सुरुवात आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया प्रकाश तिवारी यांनी व्यक्त केली.

या मदतीबद्दल तिवारी कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या रुग्ण मदत टीमचे आभार मानले. महाआरोग्य शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष उपचार व आवश्यक वैद्यकीय साधने मिळवून देत असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५७८**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- १८/०८/२०२६**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- शिरीन अजीम शेख

प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १८६२ न.प.घर नं.१४-९९/उ/५ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१४-९९/उ/५ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला --------------------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा:
पुर्व :- शेख अकबर यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- शेख निहाल शेख बखतर पटेल यांनी याच सिटी सर्व्हे नंबर मधील खरेदी घेतलेली जागा
उत्तर :- अक्रम युनूस सय्यद यांची जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**अंबाजोगाई येथील श्रीम. प्रियंका जे. लिमाडे २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबाजोगाई यांच्या न्यायालयात**
**किरकोळ अर्ज क्र.५३५/२०२६**
**रोहीणी वि. निरंक**

अर्जदार १. रोहीणी संजय देशपांडे उर्फ रोहिणी राजपाल कुलकर्णी, वय. ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सारडा कॉलनी, गंगाखेड, ता. गंगाखेड जि. परभणी.

विरूध्द निरंक

अर्जदार क्र.१ च्या मयत राजपाल केशवराव कुलकर्णी व मयत निर्मला राजपाल कुलकार्णी हे अर्जदाराचे आई व वडील आहेत. मयत नामे राजपाल केशवराव कुलकर्णी हे दिनांक ०८/०७/२०११ रोजी मयत झाले आहेत. यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदारास शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्राची आवश्यक्ता आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखे पासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेख्यावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदत्तीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहून अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देईल पुढील तारीख २२/०९/२०२६ नेमुण देण्यात आलेली आहे.

आज ता. २१ माहे ०८ सन २०२६ रोजी माझ्या सहीशिनी व न्यायालयाचे शिक्क्या निशी दिला.

(शिक्का) — **आदेशावरून स.अधीक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,अंबाजोगाई**

### टी.सी. हरवला आहे

प्रधान यश विजय या नावाचा इयत्ता दहावी उत्तीर्ण वर्गाचा महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथील टी.सी. गेवराई ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे.सदर टी.सी. कोणास सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्र.: ९३५९८२३१८२

**पान १ वरून....**

**खांडेपारगाव शिवारात...**

हाती लागला. कारची झडती घेतली असता पाठीमागील सीटवर विविध कंपन्यांचा गुटखा आढळून आला.

या प्रकरणी सचिन भिमराव माटे (वय ३४, रा. भीमनगर, गेवराई) आणि रशीद सय्यद (रा. उमापूर, ता. गेवराई) यांच्याविरुद्ध पिपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५९/२०२६, कलम १२३, २७३, २७४, २२३, ३(५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पिपळनेर पोलीस करीत आहेत.

एलसीबी पथकाची धडाकेबाज कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोहवा अर्जुन यादव, पोहवा गोविंद राख, पोलीस अंमलदार अश्पाक सय्यद, मनोज परजणे, बबन सलगर व चालक पोलीस अंमलदार नितीन वडमारे यांनी केली.

# आदित्य कृषी महाविद्यालयात 'स्वच्छता पंधरवडा' भव्य रॅलीसह वृक्षारोपण

## ४३१ झाडांची लागवड, विद्यार्थ्यांचा वृक्ष संगोपनाचा संकल्प

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त व राष्ट्रीय सेवा योजना (छडड) यांच्या संयुक्त विद्यमाने आदित्य कृषी महाविद्यालय, बीड येथे 'स्वच्छता पंधरवडा' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परिसर स्वच्छता, जनजागृती रॅली आणि वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालय परिसरात तब्बल ४३१ वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प केला.



छडड स्वयंसेवक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता करून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती व जलसंरक्षणाचे संदेश देणारी भव्य रॅली काढली.

हा उपक्रम आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली, तर प्राचार्य प्रा. श्याम भुतडा यांच्या नियोजनातून पार पडला.

उपक्रमासाठी छडड कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रसाद खेडकर, प्रा. वैशाली मिसाळ, डॉ. निर्मला ठोके, प्रा. सातपुते, प्रा. राऊत व प्रा. धावणे यांनी परिश्रम घेतले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम व क्रीडा अधिकारी डॉ. शृंगारे यांनी उपक्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले.

# पत्रकार सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून तीव्र निषेध

## हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाईची मागणी पत्रकारांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको

मुंबई । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील पत्रकार सुशील थोरात यांच्यावर पाइपलाइन रोड येथे झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या हल्ल्यात थोरात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पत्रकारांवरील हल्ले गंभीर बाब असून, निर्भयपणे पत्रकारिता करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे प्रशासनाची जबाबदारी आहे. पत्रकाराचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

उपअधीक्षक टिपरसे यांच्यासह पोलीस प्रशासनाने प्रकरणाचा तपास सुरू केला असून हल्ल्याचे कारण, हल्लेखोरांची ओळख व घटनेमागील पार्श्वभूमी तपासून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी आणि राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केली आहे.पत्रकारांवरील हल्ल्यांविरोधात संघटना ठामपणे पत्रकारांच्या पाठीशी असून, या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा केला जाईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.




# सणासुदीच्या काळात साखरेचा गोडवा कायम राहणार; केंद्र सरकारचं मोठं पाऊल

## १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी




सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी केंद्र सरकारने आता मोठं पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त (डींसरी खोंीी ॲीं) आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात सुमारे ४० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. असे असतानाच हा निर्णय घेण्यात आला असून सर्वसामान्य नागरिकांना यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सणासुदीच्या काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करणे आणि बाजारातील किमतींवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचलल्याचे बोललं जात आहे.

सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने (ऊॠऋढ) गुरुवारी एक अधिसूचना जारी करून, कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क मर्यादा तात्पुरती हटवली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून साखरेच्या किमती सातत्याने वाढत होत्या. ऑगस्टच्या सुरुवातीला, किरकोळ साखरेचे दर ४८ ते ५० रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचले होते, तर घाऊक दर ४,७५० ते ४,८०० रुपये प्रति क्विंटलच्या दरम्यान होते.

अशातच, आता, ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, १० लाख टन कच्ची साखर कोणत्याही आयात शुल्काशिवाय देशात आयात केली जाईल. ही सूट टॅरिफ रेट कोटा (ढठट) अंतर्गत देण्यात आली आहे, याचा अर्थ ही सुविधा केवळ एका विशिष्ट प्रमाणासाठी उपलब्ध असेल, त्यानंतर जुने शुल्क पुन्हा लागू होईल, अशी माहिती आहे. यापूर्वी,

# गेवराई मतदार संघाच्या शाश्वत विकासासाठी कटिबध्द - आ. विजयसिंह पंडित

## भेंडटाकळी येथे १४ कोटी ७५ लाखांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ

गेवराई : राज्याच्या सक्षम उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणींच्या माध्यमातून माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरु आहेत. विकासकामांचा हा वेग यापुढेही कायम राहणार असून गोदावरीच्या धर्तीवर सिंदफणा नदीपात्रात बॅरेजची श्रृंखला निर्माण करण्याच्या कामाचा पाठपुरावा सुरु आहे. दळणवळण, आरोग्य, शिक्षण, विज, सिंचन अशा बहुआयामी विकासासाठी प्रयत्न सुरु असून गेवराई मतदार संघाच्या शाश्वत विकासासाठी कटिबध्द असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. मौजे भेंडटाकळी येथे एकूण १४ कोटी ७५ लाख रुपये किंमतीच्या विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ जातेगाव फाटा ते वाहेगाव रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे, जातेगाव फाटा ते भेंडटाकळी रस्त्यावर पुलाचे बांधकाम करणे, भेंडटाकळी येथे नवीन पशुवैद्यकीय



दवाखाना इमारत बांधकाम करणे तसेच आमदार निधीतून हनुमान मंदिरासमोर सभामंडपाचे बांधकाम करणे या १४ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध कामांचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्याहस्ते शुक्रवार, दि.२१ ऑगस्ट रोजी करण्यात आला. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, सध्या पावसाने अखडते घेतले असले तरी जायकवाडी धरणातील पाणी साठ्यामुळे गोदावरी काठच्या शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गोदावरी नदीमध्ये स्व.अजितदादा पवार यांनी उभारलेल्या बॅरेजच्या साखळीचे महत्व आज आपल्याला कळते. गोदावरी नदीप्रमाणेच सिंदफणा नदीवर बॅरेजेसची साखळी उभारून या भागातील सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जातेगाव फाटा ते वाहेगाव रस्त्यावरील मोठे चढ कमी करून रस्त्याची रुंदी वाढविल्यामुळे या भागातील जड वाहतुक करणाऱ्या वाहनांना त्याचा लाभ होणार आहे. पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे सतत अडथळा ठरणाऱ्या पुलाचेही काम होत असल्यामुळे बीड आणि गेवराई या तालुक्यातील अंतर आणि वेळ कमी होण्यास मदत होईल असा विश्वास त्यांनी यानिमित्ताने व्यक्त केला.पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवछत्र परिवार हा जनतेच्या सुख-दुःखात कायम उभा राहिला आहे. विकासकामांना प्राधान्य देतानाच भेंडटाकळी व परिसरातील विविध गावांचे छोटे-मोठे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला जाईल. भेंडटाकळी येथील मातंग व बौद्ध समाजाच्या समाजमंदिरांच्या कामांसह पात्र लाभार्थ्यांची वैयक्तिक लाभाची कामेही मार्गी लावली जातील. आतापर्यंत जनतेने शिवछत्र परिवारावर विश्वास ठेवला असून, यापुढेही खंबीरपणे पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भेंडटाकळी व पंचक्रोषीतील नागरीकांनी आ.विजयसिंह पंडित यांचा यावेळी भव्य सत्कार करून आभार व्यक्त केले. जातेगाव फाटा येथून त्यांची मोटार सायकल रॅलीद्वारे भव्य मिरवणुक काढण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम उबाळे यांनी केले, तर कालीदास नवले, सुनील देवकर व अशोक शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून आ. विजयसिंह पंडित यांच्या कामाचे कौतुक केले. सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते ज्ञानोबा माऊली आबुज, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदीप औटी, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालीदास नवले, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष रविंद्र बोराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, उपअभियंता ऋषिकेश चिरके, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक जगन्नाथ शिंदे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी सभापती वसंतराव उबाळे, माजी जि. प. सदस्य बाबुराव काकडे, सरपंच शामराव मुळे, माजी सभापती मुजीब पठाण, माजी जि. प. सदस्य जालिंदर पिसाळ, सरपंच धनेश्वर खेत्रे, विष्णूपंत घोंगडे, परमेश्वर धायगुडे, लक्ष्मण देवकर, घनशाम आबुज, दत्ता घवाडे, रविंद्र शिर्के, सदाशिव आबुज, सुनिल राऊत, योगेश गाडे, विष्णू गोरे, कैलास पवार, रविंद्र जंगले, केशव जाधव, प्रल्हाद गायकवाड यांच्यासह विविध पदाधिकारी, सरपंच, माजी सरपंच व कार्यकर्ते उपस्थित होते. भेंडटाकळी, वाहेगाव, आम्ला, नांदलगाव, चिंचोली, मालेगाव, रामेश्वर, भेंड बु., भेंड खु., सुलतानपूर, लोणाळा, नंदपूर, कांबी, खेर्डा आदी पंचक्रोशीतील शेतकरी, ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाथरी शहरात कापूस व्यापा-याचे अपहरण

पाथरी : शहरातील बीड-परभणी हायवे क्रमांक ६१ वर एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एकता नगर येथील रहिवासी असलेल्या आणि कापसाचा व्यवसाय करणा-या पुरूषोत्तम सोमानी नामक व्यापा-याचे भररस्त्यातून शुक्रवार, दि.२१ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास अवघ्या ३ सेकंदात अपहरण करण्यात आले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समाज माध्यमांवर व्हायरल होत असून अपहरणाच्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झालेल्या या घटनेत व्यापारी आपल्या दुचाकीवरून जात असताना अचानक एका पांढ-या रंगाच्या कारने त्यांना अडवल्याचे दिसत आहे. त्यानंतर गाडीतून काही व्यक्ती खाली उतरुन अवघ्या काही सेकंदांतच व्यापा-याला जबरदस्तीने गाडीत ओढून नेतात आणि गाडी घेऊन तेथून पळ काढतात. ही संपूर्ण घटना इतक्या वेगाने घडली की, आसपासच्या लोकांना काही समजण्याच्या आतच व्यापा-याला पळवून नेण्यात आले. या घटनेमुळे उपस्थितांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

या घटनेमुळे पाथरीमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अबाधीत आहे का असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. महामार्गावर भर दुपारी अशा पध्दतीने झालेले अपहरण नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरले असून शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाथरीचा बिहार होतोय का? असा संतप्त सवाल आता सामान्य जनतेतून विचारला जात आहे. पोलिस या घटनेचा तपास करत आहेत. सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. मात्र, या घटनेने शहराच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.



व्यापाऱ्यांत भितीचे वातावरण;कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

# सोन्याचे गलसर लांबविणाऱ्या महिला आरोपीस अटक

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधून सोन्याचे गलसर चोरी करणाऱ्या महिला आरोपीस अंबाजोगाई शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तिच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करत पोलिसांनी गुन्हा घडल्यापासून अवघ्या एका महिन्याच्या आत हा गुन्हा उघडकीस आणला.

दि. १५ जुलै२०२६ रोजी दुपारी सुमारे १.१५ वाजता अंबाजोगाई बसस्थानक येथे ही चोरीची घटना घडली. फिर्यादी जरीन ईस्माईल मुजावर (वय २४ वर्षे, रा. गाडिपुरा, धाराशिव) या आपल्या पतीसोबत धाराशिव येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत होत्या. यावेळी बसस्थानकावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या पर्समधून काळ्या मण्यांमध्ये गुंफलेले अंदाजे ८.९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गलसर, किंमत सुमारे ५६ हजार रुपये, चोरून नेले होते. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात सीआर क्र. ३०९/२०२६, कलम ३०३ (२) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक माहिती तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. कौशल्यपूर्ण तपासातून लातूर येथील एका महिला आरोपीकडून निष्पन्न करण्यात आला. पोलिसांनी संबंधित महिला महेक शेख रा लातूर आरोपीस ताब्यात घेऊन तिच्याकडून चोरीस गेलेले ८.९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गलसर हस्तगत केले. त्यामुळे चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला आहे.

या कारवाईमुळे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेला चोरीचा गुन्हा घटनेपासून एका महिन्याच्या आत उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक तेजस वावळे करीत आहेत.

# आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा!:- प्राचार्य डॉ विश्वास कदम

## जय भवानी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी)

आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा ! असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. व बी.एस्सी. पदवीधारक विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण समारंभ प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते.या समारंभास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री.शिवाजीराव पंडित कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते.

यावेळी महाविद्यालयातील बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या पदवीधारक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. पदवी प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून येत होते.

प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, पदवी ही केवळ शिक्षण पूर्ण केल्याची पावती नसून भविष्यातील जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याची प्रेरणा आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, तसेच बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाताना सातत्याने नवनवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेत, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव आपल्या कार्यातून उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



समारंभाच्या निमित्ताने महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पदवी वितरणाचा हा अविस्मरणीय क्षण विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांसाठीही अभिमानाचा ठरला.या प्रसंगी विद्यापीठ ध्वजासह पाहुणे व पदवीधर विद्यार्थी यांची रॅली काढुन वातावरण निर्मीती करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी कल्याण विभाग व परीक्षा विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते.या पदवी वितरण समारंभाचे संचलन विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ. कल्पना घारगे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी मानले.हा समारंभ यशस्वी करण्यासाठी प्रा.सोमनाथ घाडगे,प्रा. डॉ.सुनिल जाधव व प्रा. डॉ.प्रविण शिलेदार आदिनी अथक परिश्रम घेतले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी नव्या ध्येयाने, आत्मविश्वासाने आणि सामाजिक बांधिलकीने पुढील वाटचाल करावी, या शुभेच्छांसह पदवी वितरण समारंभाची सांगता झाली.



**मेहंदीच्या रंगातून उमटला माणुसकीचा सुगंध.!**

अहिल्यानगर - नागपंचमीनिमित्त रचना कला महाविद्यालयाचा सामाजिक उपक्रम स्नेहालयातील मुली व महिलांच्या हातावर विद्यार्थिनींनी रेखाटल्या आकर्षक मेहंदीच्या कलाकृती. रचना कला महाविद्यालयाचा अनोखा सामाजिक उपक्रम.



## पद मोठे असले तरी माणुसकी त्याहून मोठी, 'लोंढे आहेस ना!' म्हणत जुन्या मित्राला आपुलकीची हाक

बीड । प्रतिनिधी

राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढत गेली की माणसांपासून दुरावल्याचे अनेकदा पाहायला मिळते. मात्र शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांचा साधेपणा आणि जुन्या माणसांशी असलेली आपुलकी याची नुकतीच मनाला भावणारी प्रचिती आली.

कामानिमित्त अँड. नवले यांच्या निवासस्थानी गेले असता, काम आटोपून बाहेर पडताना एक व्यक्ती त्यांना भेटला. आप्पा, मला ओळखलं का ? असे विचारताच क्षणाचाही विलंब न करता आप्पांनी, हो, तू लोंढे आहेस ना! असे म्हणत त्याची आपुलकीने विचारपूस केली.

जुना परिचय आठवताच अँड. नवले यांनी कोणताही मोठेपणा न दाखवता त्याच्यासोबत चक्क पायऱ्यांवर बसून मनमोकळ्या गप्पा मारल्या. एवढेच नव्हे तर त्याच्या भावाशीही फोनवर संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी अँड. चंद्रकांत आप्पा नवले म्हणाले, जुन्या माणसांची भेट झाली, जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, याचा मनापासून आनंद झाला.या प्रसंगातून एकच गोष्ट अधोरेखित झाली-पद कितीही मोठे असले तरी माणुसकी, आपुलकी आणि नाती जपणारा माणूसच खऱ्या अर्थाने मोठा असतो. अँड. नवले यांच्या या साध्या, मनमोकळ्या स्वभावाने उपस्थितांच्या मनातही आपुलकीची भावना निर्माण केली.

# चकलांबा येथील विविध योजना व विकास कामातील गैरप्रकाराची कठोर चौकशी करा- ग्रा.पं.सदस्या सौ. गयाबाई खेडकर यांची मागणी

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा ग्रामपंचायत कार्यालय चकलांबा अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत विविध निधी व योजनांतर्गत झालेल्या विकासकामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चकलांबा ग्रामपंचायत सदस्या सौ. गयाबाई बाळासाहेब खेडकर यांनी केली आहे.

या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामपंचायत कार्यालय चकलांबा अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच विविध शासकीय निधी व योजनांच्या माध्यमातून अनेक सार्वजनिक विकासकामे करण्यात आलेली आहेत.

सदर कामांमध्ये वित्त आयोगाचा निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण



रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत झालेली कामे, ११ अंगणवाडी इमारती कामे, खासदार निधी, आमदार निधी, अल्पसंख्याक विकास निधी, तांडा वस्ती विकास निधी, दलित वस्ती सुधार योजना/निधी तसेच ग्रामपंचायतमार्फत राबविण्यात आलेल्या इतर सर्व शासकीय योजना व निधीतून झालेल्या सार्वजनिक कामांचा समावेश आहे.

सदर सन २०१३ ते २०२६ या कालावधीत वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या सर्व कामांची वर्षनिहाय व कामनिहाय चौकशी करण्यात यावी.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जानेवारी २०१३ ते जुलै २०२६ या कालावधीत झालेल्या सर्व सार्वजनिक कामांची चौकशी करण्यात यावी.ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या ११ अंगणवाडीच्या कामांची स्वतंत्रपणे चौकशी करून मंजुर निधी, प्रत्यक्ष खर्च, कामाची गुणवत्ता व न झालेली कामे, बोगस बिले,सद्यस्थिती तपासण्यात यावी.खासदार निधी व आमदार निधीतून ग्रामपंचायत चकलांबा अंतर्गत झालेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी.अल्पसंख्याक विकास निधीतून झालेल्या सर्व कामांची निधी, मंजुरी, खर्च व प्रत्यक्ष कामाच्या आधारे तपासणी, तांडा वस्ती विकास निधीतून झालेली कामे,दलित वस्ती सुधार योजना, निधीतील कामे, आमदार व खासदार निधीतून झालेल्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात यावी.वरील सर्व कामांबाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका, मस्टर रोल, बिल-वाउचर, देयके, ठराव व संबंधित सर्व अभिलेखांची तपासणी करण्यात यावी.मंजूर कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत किंवा नाहीत, कामाच्या अंदाजपत्रकानुसार व मंजूर गुणवत्तेनुसार काम झाले आहे किंवा नाही, याची प्रत्यक्ष स्थळ पाहणी व पंचनामा करण्यात यावा.

निधीचा गैरवापर, आर्थिक अनियमितता, खोटी व अपूर्ण कामे, बनावट कागदपत्रे किंवा शासन निधीचा अपहार आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी अथवा जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी,सदर चौकशी स्वतंत्र चौकशी समितीमार्फत करून चौकशीचा सविस्तर अहवाल तयार करण्यात यावा.चौकशीत दोषी आढळणाऱ्या व्यक्तींकडून शासन निधीची वसुली करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.सदर प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन जानेवारी २०१३ ते जुलै २०२६ या कालावधीतील वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, ११ अंगणवाडी, खासदार निधी, आमदार निधी, अल्पसंख्याक निधी, तांडा वस्ती, दलित वस्ती तसेच इतर सर्व शासकीय निधी व योजनांतर्गत झालेल्या कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असे ग्रामपंचायत सदस्य सौ.गयाबाई बाळासाहेब खेडकर यांनी म्हटले आहे.निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, बीड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती गेवराई, आणि तहसीलदार, गेवराई यांना देण्यात आल्या आहेत.

# पावसाच्या खंडाने बीड-शिरूरमध्ये खरीप पिके धोक्यात, तातडीने पंचनामे करा

## शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसह पीकविम्याचा लाभ द्या,डॉ. योगेश क्षीरसागर यांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यात पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने खरीप पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने संयुक्त पंचनामे करून शेतकऱ्यांना शासकीय आर्थिक मदतीसह पीकविम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी भाजप नेते डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बीड व शिरूर कासार तालुक्यात यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कापूस, सोयाबीन, मूग, उडीद व तूर





पिकांची पेरणी केली. सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने पिकांची वाढ चांगली झाली; मात्र सोयाबीन शेंगा भरण्याच्या आणि कापूस पाते-बोंड धरण्याच्या संवेदनशील अवस्थेतच पावसाने दडी मारल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

पावसाअभावी नदी-नाले, विहिरी व साठवण तलावांची पाणीपातळी खालावली असून सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याची समस्याही उद्भवण्याची शक्यता आहे. बियाणे, खते, औषधे व मशागतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याच्या भीतीने शेतकरी चिंतेत आहे.

या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी व संबंधित यंत्रणांमार्फत गावनिहाय प्रत्यक्ष पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत. बाधित शेतकऱ्यांना निकषानुसार तातडीने आर्थिक सहाय्य, पीकविमा भरपाई व शासकीय सवलती लागू कराव्यात, अशी मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# दगडफेक प्रकरणातील आरोपींना पळवून लावणाऱ्यांवरही कारवाई करा.!

## वडवणीत कडकडीत बंदला तुफान प्रतिसाद, तणावपूर्ण शांतता..!!

वडवणी : प्रतिनिधी

वडवणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात शुक्रवारी (दि. २१) पार्किंगच्या कारणावरून झालेल्या वादाचे दगडफेकीत रूपांतर झाले. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून वाहनांचेही नुकसान झाल्याची माहिती आहे. घटनेच्या निषेधार्थ तसेच दगडफेक करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि आरोपींना पळवून लावणाऱ्यांनाही सहआरोपी करावे, या मागणीसाठी शनिवारी वडवणी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

घटनेनंतर नागरिकांनी मोठ्या संख्येने वडवणी पोलीस ठाण्यासमोर गर्दी करून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. दगडफेकीत चार ते पाच जण गंभीर तर सुमारे दहा जण किरकोळ जखमी झाल्याची



प्राथमिक माहिती असून गंभीर जखमींना बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले.

पूर्वीही पार्किंगवरून वाद झाल्याचा आरोप

या परिसरात यापूर्वीही पार्किंगच्या कारणावरून दोन वेळा वाद घडून दोन्ही समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

बाबरी मुंडे यांनी, दगडफेक प्रकरणातील आरोपी गुन्हेगारी वृत्तीचे असल्याचा आरोप करत कठोर कारवाईची मागणी केली. अन्यथा पुन्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

तर संजय आंधळे यांनी व्यापाऱ्यावरील हल्ला हा संघटित गुन्हेगारांचा पूर्वनियोजित कट असल्याचा आरोप करत संबंधित आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली.

सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू

घटनेनंतर पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला असून परिस्थिती नियंत्रणात आहे. मजलसगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अरदड यांनी वडवणीत दाखल होत परिस्थितीचा आढावा घेतला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून दगडफेकीत सहभागी व्यक्तींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.दरम्यान, अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# तटबंदीच्या दगडांतून आजही ऐकू येते ४०० वर्षांची जाफराबादची कहाणी

## मुघलकालीन जहागिरीपासून निजामकालीन प्रशासनापर्यंतचा प्रवास; ऐतिहासिक वास्तू, बाजारपेठ अन् नदीकाठच्या संस्कृतीचा समृद्ध वारसा

जाफराबाद/भोकरदन : इसरारखान पठाण


जाफराबाद शहरातील जुन्या दगडी तटबंदीचे अवशेष, गढी, ऐतिहासिक मशीद, पाण्याची टाकी आणि पूर्णा-कैलना नदीचा संगम आजही शहराच्या तब्बल चारशे वर्षांच्या इतिहासाची साक्ष देत आहेत.

जुन्या गॅझेटियरमधील नोंदीनुसार औरंगजेबाच्या काळात जाफर खान यांना ११५ गावांची जहागीर देण्यात आली होती. या जहागिरीचे प्रमुख केंद्र जाफराबाद असल्याने शहराला हे नाव प्राप्त झाल्याचे सांगितले जाते.

पूर्णा-कैलना संगमामुळे व्यापारी भरभराट

नदीकाठची सुपीक जमीन आणि अनुकूल भौगोलिक स्थानामुळे जाफराबादची व्यापारी ओळख निर्माण झाली. जुन्या नोंदीनुसार येथे मंगळवार व शुक्रवार मोठा बाजार भरत असे. धान्य, कापूस, कापड, घोंगड्या यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असे.

शाहजहानाच्या काळात मुस्तफा खान तुर्कमान यांनी इ.स. १६३० मध्ये बांधलेली पाण्याची टाकी आजही तत्कालीन जलव्यवस्थेची साक्ष देते. तर औरंगजेबाच्या काळात रिझाजथ खान यांनी इ.स. १६६४ मध्ये बांधलेली ऐतिहासिक मशीद आणि



तिच्यावरील फारसी शिलालेख जाफराबादच्या इतिहासाचे महत्त्व अधोरेखित करतात.

तटबंदी अन् गुप्त बोगद्याची आख्यायिका

शहराभोवती असलेली मजबूत दगडी तटबंदी आणि आतील गढीचे अवशेष आजही पाहायला मिळतात. गढीतून पूर्णा नदीपर्यंत गुप्त बोगदा असल्याची स्थानिक आख्यायिका आहे. मात्र अधिकृत पुरावे उपलब्ध नसल्याने ही माहिती सध्या लोककथा म्हणूनच पाहावी लागते.मुघल सत्तेनंतर जाफराबाद निजामांच्या अधिपत्याखाली आले. हैदराबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतर हा प्रदेश महाराष्ट्राचा भाग झाला. पुढे जालना जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर जाफराबादला तालुक्याचे महत्त्व प्राप्त झाले.ऐतिहासिक वारसा जतन करण्याची गरज चारशे वर्षांचा समृद्ध इतिहास लाभलेल्या जाफराबादमधील तटबंदी, पाण्याची टाकी, मशीद व गढीच्या अवशेषांचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन, संवर्धन आणि दस्तऐवजीकरण होणे गरजेचे आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# प्रत्येकाच्या दारात आरोग्य पोहोचवणारा नेता ;उपचारांसोबत विश्वास देणारे लोकनेते आ.सुरेश आण्णा धस

## आरोग्य जपणारा,आपला माणूस-उपचार नाही,तर विश्वास देणारा आमदार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित असलेला आरोग्याचा प्रश्न हा केवळ उपचारापुरता मर्यादित नसून त्यामागे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा अनेक अडचणी असतात. ही वस्तुस्थिती ओळखून मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांनी आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नांना सातत्याने प्राधान्य दिले आहे. गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देणे, मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून रुग्णांना आधार मिळवून देणे, आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी व मार्गदर्शन करणे, तसेच आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करणे, अशा विविध माध्यमांतून त्यांचे आरोग्यविषयक कार्य सुरू आहे. त्यामुळे 'आरोग्य जपणारा, आपला माणूस' अशी भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांसाठी गंभीर आजारावरील उपचार हा मोठा आर्थिक प्रश्न ठरतो. उपचाराचा खर्च परवडत नसल्याने अनेकदा रुग्णांच्या कुटुंबीयांसमोर मोठे संकट उभे राहते. अशा वेळी गरजू नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे, यावर आ. सुरेश आण्णा धस यांनी भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नातून अनेक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध झाली असून, काही प्रकरणांत ५० हजार, ७५ हजार तसेच १ लाख रुपयांपर्यंतची मदत मिळाल्याने संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मदतीमुळे केवळ उपचाराचा खर्च भागविण्यास हातभार लागला नाही, तर संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी आपल्या पाठीशी उभा आहे, हा विश्वासही नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

आरोग्य सेवा ही शहरापुरती मर्यादित न राहता ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजे, या भूमिकेतून विविध आरोग्यविषयक उपक्रमांना चालना देण्यात येत आहे. आयुष्मान भारत मिशनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आरोग्य शिबिरे आयोजित करून नागरिकांची तपासणी, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि आवश्यक उपचारांसाठी पुढील प्रक्रिया उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांना पाठबळ देण्यात आले आहे. अशा आरोग्य शिबिरांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना आपल्या गावाजवळच प्राथमिक आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाची सुविधा मिळत आहे. आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यासोबतच आजाराचे वेळेत निदान व्हावे, यासाठीही या उपक्रमांचा उपयोग होत आहे.




आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला वेळेत रुग्णालयात पोहोचवणे अत्यंत महत्त्वाचे असते. ग्रामीण भागात रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे अनेकदा रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन आष्टी परिसरात १०८ रुग्णवाहिका सेवा उपलब्ध व्हावी, यासाठीही पाठपुरावा करण्यात आला आहे. आपत्कालीन आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा प्रयत्न महत्त्वाचा मानला जात आहे. एखाद्या अपघातग्रस्ताला, गंभीर आजारी रुग्णाला किंवा प्रसूतीच्या आपत्कालीन परिस्थितीतील महिलेला वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिका सेवा अत्यावश्यक असते. त्यामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील या महत्त्वाच्या गरजेकडे आ. धस यांनी लक्ष वेधले आहे.

आरोग्याच्या प्रश्नांकडे पाहताना केवळ उपचार मिळवून देण्यापेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि जनजागृती यांनाही महत्त्व दिले जात आहे. नियमित आरोग्य तपासणी, आजारांचे वेळेत निदान, शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती आणि गरजू नागरिकांना योग्य उपचाराची दिशा मिळणे, यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळ मिळू शकते. या दृष्टिकोनातून विविध सामाजिक संस्था, आरोग्य यंत्रणा आणि संबंधित विभागांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आ. सुरेश आण्णा धस यांच्या आरोग्यविषयक कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका. रुग्णाच्या कुटुंबीयांसाठी आजारपणाचा काळ हा मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण असतो. अशा वेळी मदतीचा हात मिळाल्यास कुटुंबाला मोठा आधार मिळतो. त्यामुळे आर्थिक मदतीबरोबरच संबंधित कुटुंबाला धीर देणे, उपचारासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे आणि उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, या माध्यमातून जनसेवेची संवेदनशील बाजू अधोरेखित होत आहे.

विकासकामांमध्ये रस्ते, पाणी, वीज, शिक्षण आणि रोजगार यांना जितके महत्त्व आहे, तितकेच महत्त्व आरोग्य सुविधांनाही आहे. निरोगी नागरिक हेच सक्षम समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात आरोग्य सुविधा मजबूत करणे, नागरिकांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे आणि आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी प्रयत्न करणे ही लोकप्रतिनिधी म्हणून महत्त्वाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी लक्षात घेऊन आ. सुरेश आण्णा धस यांनी आरोग्य क्षेत्रात विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

'उपचार नाही, तर विश्वास देणारा आमदार' ही भावना याच कार्यातून अधोरेखित होते. गरजू रुग्णाला मदत मिळवून देणे, आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत सेवा नेणे, आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेसाठी प्रयत्न करणे आणि शासनाच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणे, या माध्यमातून मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांचे आरोग्यविषयक लोकसेवेचे कार्य पुढे येत आहे. त्यामुळेच विकासाच्या राजकारणासोबत माणुसकीची नाळ जपणारा आणि अडचणीच्या काळात सर्वसामान्यांच्या सोबत उभा राहणारा नेता अशी त्यांची ओळख अधिक दृढ होत आहे. 'आरोग्य जपणारा, आपला माणूस' ही केवळ घोषणा न राहता सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्याची भूमिका ठरावी, हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू असल्याचे चित्र दिसून येते.

# नवीन जालन्यात उद्यान नाट्यगृह, सभागृहासाठी नगरसेवक अंबेकरांचा पाठपुरावा

एसआरपीएफच्या जागेवर विविध सुविधा उभारण्याची मागणी पिंपरी-चिंचवडच्या महापौरांकडून कौतुक

जालना शेख फारुक :- शहर विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या एसआरपीएफच्या जागेवर नवीन जालना भागातील नागरिकांसाठी भव्य उद्यान खेळाचे मैदान,जलतरण तलाव,प्रशस्त सभागृह आणि सुसज्ज नाट्यगृह उभारण्यात यावे यासाठी नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू केला आहे.

एसआरपीएफकडे मंठा चौफुली-एसआरपीएफ पेट्रोल पंप ते सिंदखेडराजा रोडपर्यंत सुमारे १५० ते २०० एकर जागा उपलब्ध आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करता या जागेचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास केल्यास नवीन जालना भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सार्वजनिक सुविधा उपलब्ध होऊ शकतात. यातील सुमारे २० एकर जागेवर भव्य उद्यान, तर पाच एकर जागेवर खेळाचे मैदान जलतरण तलाव सभागृह व नाट्यगृह उभारण्यात यावे अशी मागणी अंबेकर यांनी केली आहे.या मागणीसंदर्भात नगरसेवक अंबेकर यांनी जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसह आमदार अर्जुनराव खोतकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही पाठपुरावा केला आहे. सदरील सुविधा



उभारल्यास नवीन जालना परिसरातील नागरिकांना विरंगुळा, क्रीडा तसेच सांस्कृतिक उपक्रमांसाठी हक्काची जागा उपलब्ध होण्याबरोबरच जालना शहराच्या सौंदर्यात आणि वैभवातही भर पडणार आहे.दरम्यान या विकासकामांसाठी नियोजन कसे करता येईल यासंदर्भात अंबेकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांची त्यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी विविध विकासकामांबाबत मार्गदर्शन घेतले. जालना शहरात अशा प्रकारच्या सुविधा उभारण्यासाठी एका तरुण नगरसेवकाने सुरू केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा पाहून महापौर रवी लांडगे यांनी अश्विन अंबेकर यांचे कौतुक केले.यावेळी युवा उद्योजक शैलेश गाढे उपस्थित होते.

# देशाच्या सैनिकांसाठी विद्यार्थिनींनी बनवल्या आकर्षक राख्या

### संस्कृतीची जोपासना आणि राष्ट्रभक्तीची भावना वृद्धिंगत होईल-मुख्याध्यापक अरविंद देशमुख

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शासनाच्या 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत तालुक्यातील खरडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी विद्यार्थिनींसाठी विविध कौशल्यविकासात्मक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेचा आणि कलाकौशल्याचा सुंदर आविष्कार घडवत देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांसाठी अत्यंत सुंदर व आकर्षक राख्या तयार केल्या. तयार केलेल्या या राख्या शाळेच्या माध्यमातून जवानांपर्यंत पाठविण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राहावे, त्यांच्यामध्ये सामाजिक व भावनिक कौशल्यांचा विकास व्हावा, विविध व्यावसायिक व संभाषण कौशल्ये विकसित व्हावीत, तसेच खेळीमेळीच्या वातावरणातून नैराश्यावर मात करण्याची क्षमता निर्माण व्हावी, या उद्देशाने शासनाच्या मार्गदर्शनानुसार 'आनंददायी शनिवार' उपक्रम राबविण्यात येत आहे.

शासनाच्या प्राप्त परिपत्रकानुसार न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित या उपक्रमात विद्यार्थिनींनी विविध रंग, सजावटीचे साहित्य आणि कल्पकतेचा वापर करून आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्या देशाच्या सैनिकांना पाठविण्यात येणार असल्याने विद्यार्थिनींमध्ये विशेष उत्साह आणि राष्ट्रभक्तीची भावना दिसून आली.




या उपक्रमाचे कौतुक करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक अरविंद देशमुख म्हणाले की, विद्यार्थिनींनी अत्यंत सुंदर राख्या तयार करून आपल्या कलागुणांना वाव दिला आहे. सैनिकांसाठी राख्या तयार करण्याच्या या उपक्रमातून भारतीय संस्कृतीची जोपासना होण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ होईल.विद्यालयाचे कलाशिक्षक किशोर पवार यांनी विद्यार्थिनींना राख्या तयार करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता व नवनिर्मितीची क्षमता वाढते. त्याचबरोबर देशप्रेमाची भावना वृद्धिंगत होण्यासही मदत होते, असे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र शिंपी, गजानन म्हस्के, कल्याण जगताप, श्रीमती रेखा हरदास, डॉ. आशा फड-चाटे, अनिल पवार, अंजली देशमुख, शिवाजी देशमुख, दयानंद गजभिव, महेश जगधने यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सैनिकांसाठी विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या या राख्यांमधून 'सीमेवर लढणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता आणि देशप्रेम' हा संदेश देण्यात आला. त्यामुळे खरडगाव न्यू इंग्लिश स्कूलमधील 'आनंददायी शनिवार' उपक्रम विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणारा तसेच संस्कृती, सर्जनशीलता आणि राष्ट्रभक्तीची सांगड घालणारा ठरला.

# फ्रेश व्हायचंय ना? मग आष्टी नगरपंचायत शेजारी पन्हाळकरांचा लज्ञतदार चहा घ्या!

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) धावपळीच्या आणि दगदगीच्या जीवनात काही क्षण ताजेतवाने होण्यासाठी चहाचा आस्वाद घेणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आष्टी शहरातील नगरपंचायत शेजारी विनोद पन्हाळकर यांच्या चहाच्या स्टॉलवर मिळणारा लज्जतदार चहा सध्या चहाप्रेमींच्या विशेष पसंतीस उतरला असून, अस्सल चव, दर्जेदार साहित्य आणि चहा बनवण्याची खास पद्धत यामुळे पन्हाळकर यांच्या चहाची शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. पांढरी गावचे रहिवासी असलेले विनोद पन्हाळकर हे शांत, विनम्र आणि मेहनती स्वभावाचे तरुण असून, स्वतःच्या कष्टावर त्यांनी हा चहाचा व्यवसाय उभा केला आहे.

पन्हाळकर यांच्या चहाची सर्वात महत्त्वाची विशेषता म्हणजे चहाच्या चवीबाबत कोणतीही तडजोड केली जात नाही. ग्राहकांनी कितीही घाई केली किंवा चहा लवकर देण्याची विनंती केली, तरी चहाची चव, सुगंध आणि दर्जा योग्य प्रकारे तयार होईपर्यंत विनोद पन्हाळकर चहाचे आधण उतरवत नाहीत. 'चव जमल्याशिवाय आधण उतरत नाही' हीच त्यांच्या चहा बनवण्याची पद्धत असून, त्यामुळे त्यांच्या चहाला एक वेगळीच चव प्राप्त होत असल्याचे चहाप्रेमी सांगतात.

ग्राहकांना पार्सल देण्यापेक्षा आपल्या स्टॉलवरच ताजा आणि गरमागरम चहा देण्यावर त्यांचा भर असतो. शुद्ध म्हशीच्या दुधाचा वापर आणि त्यामध्ये योग्य प्रमाणात अद्रकाचा स्वाद हे पन्हाळकर यांच्या चहाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. दुधाचा दर्जा, अद्रकाचे प्रमाण आणि चहा बनवण्याची पद्धत यांचा योग्य मेळ साधल्यामुळे त्यांच्या चहाला वेगळी चव आली आहे. विशेष म्हणजे वाढत्या महागाईच्या काळातही एका कप चहाची किंमत केवळ सात रुपये ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांपासून व्यापारी, कर्मचारी, युवक आणि शहरातील प्रतिष्ठित




नागरिकांपर्यंत अनेकजण पन्हाळकर यांच्या चहाचा आस्वाद घेताना दिसतात.

पन्हाळकर यांच्या चहाला मिळणारा प्रतिसाद त्यांच्या दररोजच्या विक्रीतूनही दिसून येतो. सध्या दररोज सुमारे ६०० ते ७०० कप चहाची विक्री होत असून, ग्राहकांचा वाढता प्रतिसाद पाहता लवकरच दररोज एक हजार कप चहा विक्रीचा टप्पा गाठण्याचा विनोद पन्हाळकर यांचा मानस आहे. कोणत्याही मोठ्या ब्रँडचा आधार नसताना केवळ चहाची चव, दर्जा, ग्राहकांशी असलेले आपुलकीचे संबंध आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी अल्पावधीत ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.

आष्टी शहरातील नगरपंचायतीच्या परिसरात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी पन्हाळकर यांचा चहा आता आकर्षणाचे ठिकाण ठरत आहे. सकाळपासूनच चहाप्रेमींची येथे वर्दळ सुरू होत असून, दिवसभरात विविध क्षेत्रातील नागरिक येथे चहाचा आस्वाद घेताना दिसतात. मित्रांच्या गप्पा असोत, कामाच्या धावपळीतला छोटासा विरंगुळा असो किंवा दिवसभराचा थकवा घालवण्यासाठी घेतलेला गरमागरम चहाचा कप असो, पन्हाळकर यांच्या स्टॉलवर चहाप्रेमींची उपस्थिती कायम दिसून येते.

दरम्यान आष्टी शहरातील अनेक चहाप्रेमींनी विनोद पन्हाळकर यांच्या चहाचा आस्वाद घेतला. चहाची चव आणि दर्जाबाबत समाधान व्यक्त करत अनेकांनी पन्हाळकर यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील एका सामान्य तरुणाने आपल्या मेहनतीवर आणि चहाच्या अस्सल चवीच्या जोरावर व्यवसाय उभा करून ग्राहकांची पसंती मिळवणे ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. युवकांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्या आवडीच्या क्षेत्रात मेहनत, गुणवत्ता आणि सातत्य ठेवले, तर स्वतःचा व्यवसाय उभा करता येतो, याचे उदाहरण विनोद पन्हाळकर यांच्या व्यवसायातून पाहायला मिळत आहे. त्यामुळे आष्टी नगरपंचायतीशेजारील पन्हाळकरांचा सात रुपयांचा लज्जतदार चहा सध्या शहरातील चहाप्रेमींसाठी चर्चेचा आणि आकर्षणाचा विषय ठरत आहे.

# पाटोदा,शिरूरच्या हक्काच्या पाण्यासाठी व्यापक आंदोलन उभारणार-माजी आ.भीमराव धोंडे

### आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीचे लोकार्पण ;शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून आयटी कंपनी सुरू करण्याचा मानस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्हा हा मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगारांचा जिल्हा असून, या कामगारांच्या कुटुंबातील मुलांना शिक्षण, तांत्रिक कौशल्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांचा शाश्वत विकास साधणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून, आगामी काळात शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून आयटी कंपनी सुरू करण्याचा मानस आहे. त्यातून ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन आष्टी, पाटोदा, शिरूरचे लोकनेते तथा माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले.

पाटोदा येथील आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा तसेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल संस्था, किसान संस्था आणि श्री छत्रपती एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून माजी आ. भीमराव धोंडे बोलत होते. नूतन इमारतीचे उद्घाटन माजी मंत्री प्रा. सुरेश नवले आणि ज्येष्ठ माजी आ. नारायण मुंडे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे यांनी पाटोदा व शिरूर तालुक्याच्या पाणीप्रश्नावर आक्रमक भूमिका मांडली. ते म्हणाले, पाटोदा तालुका कमी पर्जन्यमानाचा असल्याने या भागात दुष्काळाचे संकट कायम आहे. पाणी उपलब्धतेअभावी या भागातील ऊसतोड कामगारांची संख्या मोठी आहे. यापूर्वी कुकडीच्या पाण्यासाठी मुंबईपर्यंत, तर उजनीच्या पाण्यासाठी दिल्लीपर्यंत मोर्चे काढले आहेत. आता पाटोदा आणि शिरूर तालुक्याच्या हक्काच्या पाण्यासाठी व्यापक आंदोलन उभारणार असून, या लढ्यासाठी जनतेने एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या या घोषणेला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दोन-तीन लाख रुपयांच्या छोट्या विकासकामांसाठी झुंजण्यापेक्षा परिसराच्या शाश्वत विकासासाठी मोठ्या प्रश्नांवर संघर्ष करण्याची गरज आहे, असेही धोंडे यांनी सांगितले. जनतेचे आशीर्वाद हीच आपली खरी ताकद असून, आपण कुणावरही नाराज नसून आपल्या नशिबावर आणि जनतेच्या प्रेमावर समाधानी आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. आपण आजही दररोज दोन तास भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात व्यायाम करून स्वतःला तंदुरुस्त ठेवतो आणि जनतेच्या हक्कांसाठी लढण्याची ऊर्जा कायम ठेवतो, असे सांगत त्यांनी उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही त्यांनी यावेळी मांडला. ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी अनुकूल वातावरण मिळावे, यासाठी वसतिगृह सुरू करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. पाटोदा तालुक्यातील अनेक कुटुंबे ऊसतोडीवर अवलंबून आहेत. तांत्रिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक युवकांना अपेक्षित रोजगार मिळत नाही. त्यामुळे पाटोद्यात अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात आले असून, तांत्रिक शिक्षण घेतलेल्या युवकांना वर्क फ्रॉम होमसह रोजगाराच्या विविध संधी मिळाव्यात, हा त्यामागील उद्देश असल्याचे धोंडे यांनी सांगितले.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बाहेरच्या जिल्ह्यात जावे लागू नये, यासाठी विविध शैक्षणिक संस्था उभारण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. आष्टी येथे वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय यांसह विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पाटोदा येथे सुरुवातीला महिला महाविद्यालय सुरू करण्यात आले.



त्यानंतर संत बाळुदेव विद्यालय, आनंदराव धोंडे पॉलिटेक्निक कॉलेज यांसह विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आगामी काळात डी.एड., बी.एड. यांसह आणखी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. आज या संस्थांमध्ये तीनही तालुक्यांबरोबरच बाहेरील जिल्ह्यांतील विद्यार्थीही शिक्षण घेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण न देता रोजगाराभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण देण्यावर भर देण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेच्या माध्यमातून आगामी काळात आयटी कंपनी सुरू करण्याचा मानस असून, या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगार आणि घरातून काम करण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बोकारे यांनी केले. यावेळी माजी मंत्री प्रा. सुरेश नवले, ज्येष्ठ माजी आ. नारायण मुंडे, माजी आ. राजेंद्र जगताप, माजी आ. जनार्दन तुपे, माजी आ. सिराज देशमुख, माजी आ. सौ. संगीताताई ठोंबरे आणि ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या कार्यकाळातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमास सौ. दमयंतीताई धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजयदादा धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, पाटोदा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दीपक घुमरे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव खेडकर, बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती नियामत बेग, अशोक हिंगे, माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड, माजी सभापती अनिल जायभाये, नगरसेवक संतोष जाधव, सरपंच दादासाहेब जगताप, दिलीपराव म्हस्के, आनुरथ सानप, इंदूअक्का गोल्हार, शाम हुले, राजपाल शेंडगे, गणेश कवडे, माणिक खेळकर, गणेश खाडे, मन्सूरभाई, शिवाजीराव गर्जे, स्वामी सानप, बाळासाहेब आवारे, विजयशेठ कोठारी, नरेंद्रकाका कंकारीया, पत्रकार उत्तम बोडखे, विठ्ठल सानप, माजी नगरसेवक बाळासाहेब शिंदे, रत्नदीप निकाळजे, ड. आश्रफभाई सय्यद, बाळासाहेब पवार, गुलाबराव घुमरे, आजिनाथ गवळी, अंकुशर मुंढे, संभाजी जगताप, अशोक दहिफळे, इंजि. वैभव बडे, इंजि. एम. एन. बडे, संतोष गोल्हार, आजिनाथ घुमरे, बाबासाहेब कवठेकर, हरिभाऊ जंजिरे, महारुद्र खेडेकर, महींद्र नागरगोजे, विजय जोशी, सुरेश राख, एकबाल पेंटर, विष्णू गायकवाड, दत्ता सातपुते, नवनाथ सानप, कॉ. महादेव नागरगोजे, जालिंदर गायकवाड, संदीप नागरगोजे, भाऊसाहेब भराटे, किरणभाभी कांकरीया, नारायण नागरगोजे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य राठोड, प्रा. राजेंद्र अविळे, संस्थेचे प्रशासन अधिकारी डी. बी. राऊत, प्राचार्य शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ, प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर यांच्यासह सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संस्थेचे प्रशासन अधिकारी तथा प्राचार्य शिवदास विधाते यांनी मानले. नूतन इमारतीच्या लोकार्पणासोबतच झालेल्या सहविचार सभेत शिक्षण, तांत्रिक कौशल्य, रोजगार, ऊसतोड कामगारांच्या मुलांचे भविष्य, पाणीप्रश्न आणि ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासावर झालेल्या विचारमंथनामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# घरफोडीच्या चार गुन्ह्यांतील फरार हिस्ट्रीशिट जेरबंद

## चोरीच्या मोटारसायकलीसह तलवार,कटर,ग्लायंडर जप्त सदर बाजार डी.बी.पथकाची धडाकेबाज कारवाई

तब्बल १ लाख ६७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

जालना शेख फारुक :- घरफोडीच्या तब्बल चार गुन्ह्यांत फरार असलेल्या हिस्ट्रीशीटर आरोपीला सदर बाजार पोलिसांच्या डी.बी. पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करून जेरबंद केले. विजयसिंग कृष्णासिंग भादा वय ४३ रा.वलीमामुदर्गा जालना असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून चोरीची मोटारसायकल घरफोडीसाठी वापरलेल्या दोन मोटारसायकली तलवार लोखंडी कटर ग्लायंडर मशीन व इलेक्ट्रिक कटर मशीन असा एकूण १ लाख ६७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.२१ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे १० वाजता सदर बाजार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप भारती यांच्या आदेशानुसार डी.बी.पथक हद्दीत पेट्रोलिंग करीत होते.यावेळी घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये फरार असलेला हिस्ट्रीशीटर विजय भादा हा वलीमामुदर्गा परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक भारती यांना मिळाली. त्यांनी तत्काळ डी.बी.पथकाला आरोपीला ताब्यात घेण्याचे आदेश दिले.डी.बी.पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांच्यासह पथक दोन पंचांसह वलीमामुदर्गा परिसरात दाखल झाले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने लाल रंगाच्या मोटारसायकलवरून पळ काढण्याचा प्रयत्न केला.मात्र पोलिसांनी त्याचा पाठलाग करून शिताफीने त्याला ताब्यात घेतले.चार घरफोडीच्या गुन्ह्यांत होता फरार पोलिसांनी अधिक विश्वासात घेऊन आरोपीची चौकशी केली असता त्याने सदर बाजार पोलिस ठाण्यातील गुन्हा क्रमांक २०४/२०२६, ४४१/२०२६, ४३४/२०२६ आणि ३२७/२०२६ या चार घरफोडीच्या गुन्ह्यांत फरार असल्याचे निष्पन्न झाले. या सर्व गुन्ह्यांमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हे दाखल आहेत.

मोठा चौफुली परिसरातून मोटारसायकल चोरीची कबुली

चौकशीदरम्यान आरोपीने मोठा चौफुली परिसरातून आकाशी रंगाची शाईन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून ही मोटारसायकल जप्त करण्यात आली असून याप्रकरणी तालुका जालना पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४१८/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल आहे.याशिवाय घरफोडीचे गुन्हे करताना वापरलेल्या नेव्ही ब्लू रंगाच्या शाईन मोटारसायकल व लाल रंगाच्या ड्रीम निओ मोटारसायकलसह धारदार तलवार,लोखंडी कटर, ग्लायंडर मशीन आणि इलेक्ट्रिक कटर मशीन असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.या कारवाईमुळे घरफोडीच्या गुन्ह्यांच्या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली असून आरोपीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली धडाकेबाज कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तथा पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

डी.बी.पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप, पोहेकॉ.जगन्नाथ कानडजे, तानाजी कानुरे,जगन्नाथ जाधव,पोलीस कॉन्स्टेबल भगवान मुंजाळ,दुर्गेश गोफणे, अजीम शेख,राहुल कटकम, संदीप गोतीस,धनाजी लोंढे व महिला पोलीस हवालदार मगर यांच्या पथकाने ही कारवाई केली.



# श्रृंगेरी विद्यालयाने अनेक विद्यार्थी घडवले;मला शाळेचा अभिमान-पोपटराव काळे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ब्रह्मगाव येथून १९७९ मध्ये सातवी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आष्टी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेशिवाय आमच्यासमोर दुसरा पर्याय नव्हता. ब्रह्मगाव ते आष्टी हे सुमारे सहा किलोमीटरचे अंतर असल्याने कधी पायपीट करून, तर कधी वसतिगृहात राहून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. मात्र मुलींच्या शिक्षणाची मोठी गैरसोय होत असल्याने अनेक मुलींचे शिक्षण अर्धवट राहिले. ही अडचण लक्षात घेऊन तत्कालीन आमदार भीमराव धोंडे साहेब यांच्या पुढाकारातून १९९१ मध्ये शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून गावात श्रृंगेरी विद्यालय सुरू झाले. या विद्यालयाने आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडविले असून विविध क्षेत्रांत त्यांना यशस्वी होण्याची संधी दिली आहे. या विद्यालयाच्या कार्याचा मला मनापासून अभिमान आहे, असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी तथा साहित्यिक पोपटराव काळे यांनी केले. श्रृंगेरी विद्यालयातील कार्यक्रमात पोपटराव काळे बोलत होते.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने त्यांनी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती सविता पांडुरंग माने यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना पोपटराव काळे यांनी श्रृंगेरी विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक केले.

विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर विद्यालयाने दिलेला भर कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले. श्रृंगेरी विद्यालयातून आजपर्यंत अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. या विद्यालयाने सैनिक, डॉक्टर, इंजिनियर, वकील, शिक्षक, पोलीस अधिकारी तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले सुजाण नागरिक घडविले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांच्या स्वप्नांना दिशा देण्याचे काम विद्यालयाने केले आहे.

आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देताना पोपटराव काळे म्हणाले, गावच्या मातीत झालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. शाळा ही केवळ ज्ञान देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे संस्कारकेंद्र असते. श्रृंगेरी विद्यालयाने अनेक विद्यार्थी घडवून समाजाच्या विविध क्षेत्रांत योगदान देणारे नागरिक निर्माण केले आहेत.

यावेळी श्रृंगेरी विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक परमेश्वर शहाजी पवार, ज्येष्ठ शिक्षक सुभाषराव गदादे, मुख्याध्यापिका श्रीमती सविता पांडुरंग माने, तसेच पठाण सर, शिंदे सर, बनसोडे सर, धोत्रे सर, पवार सर, श्रीमती साळप्पा मॅडम, शिंदे मॅडम, युनुस मामा, खिलारे मामा यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करून त्यांच्या जीवनाला नवी दिशा देणाऱ्या श्रृंगेरी विद्यालयाच्या कार्याचा गौरव करणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# घरकुलाच्या सर्वेक्षणात गरजवंतांना डावलले

## घनसावंगीत राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक २४ हजार ९३० जणांचे सर्वेक्षण पात्र-अपात्रतेची कारणे मात्र गुलदस्त्यात

घनसावंगी प्रतिनिधी :- प्रधानमंत्री आवास योजनेच्या सन २०२६-२७ मधील घरकुल सर्वेक्षणावरून घनसावंगी तालुक्यात प्रशासनाविरोधात संतापाची ठिणगी पडली आहे. सर्वेक्षणात अनेक गरजू व पात्र कुटुंबांना डावलण्यात आल्याचा तर मोठ्या संख्येने नागरिकांना सर्वेक्षणाच्या प्रक्रियेपासूनच वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट ने केला आहे. विशेष म्हणजे २४ हजार ९३० लाभार्थ्यांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगितले जात असले तरी पात्र किती आणि अपात्र किती याचे उत्तर प्रशासनाकडून स्पष्टपणे दिले जात नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणी तातडीने फेरसर्वेक्षण करून खऱ्या गरजू कुटुंबांना घरकुल योजनेत समाविष्ट करावे अपात्रतेची कारणे लेखी स्वरूपात स्पष्ट करावीत आणि त्रुटींची पूर्तता करण्यासाठी लाभार्थ्यांना संधी द्यावी अशी मागणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण जालींदरराव सपाटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

२४ हजार ९३० जणांचे सर्वेक्षण तरीही अनेक गरजू वंचित सन २०२६-२७ साठी घनसावंगी तालुक्यात २४ हजार ९३० लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी २१ हजार ५६३ लाभार्थ्यांनी वैयक्तिक पद्धतीने तर ३ हजार ३६७ जणांचे असिस्टंटच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.मात्र सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पात्र-अपात्र लाभार्थ्यांची अधिकृत व स्पष्ट माहिती सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला आहे.

ग्रामसेवकापासून बीडीओपर्यंत हेलपाटे!

आपले नाव पात्र आहे की अपात्र अपात्र असल्यास नेमके कारण काय सर्वेक्षणात कोणती त्रुटी आहे याची माहिती घेण्यासाठी नागरिकांना ग्रामसेवकापासून गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत चकरा माराव्या लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. घरकुल मिळेल का? या आशेने कार्यालयाचे उंबरठे झिजविणाऱ्या गोरगरिबांना स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अपात्र लाभार्थ्यांना त्रुटी दूर करण्यासाठी पुरेशी संधी आणि स्पष्ट कालमर्यादा देण्यात यावी अशी मागणीही करण्यात आली आहे.


घरकुल मंजुरीसाठी पैशांची मागणी झाल्यास खपवून घेणार नाही

घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. गोरगरीब शेतमजूर,महिला, दिव्यांग आणि वंचित लाभार्थ्यांकडून घरकुल मंजुरीसाठी पैशांची मागणी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादीने केली आहे.

काही ठिकाणी समान नावांमुळे एका व्यक्तीच्या नावावरील घरकुलाचे अनुदान दुसऱ्याच व्यक्तीने उचलल्याचे प्रकार घडल्याचाही आरोप करण्यात आला आहे.त्यामुळे लाभार्थ्यांची ओळख कागदपत्रे आणि बँक खात्यांची काटेकोर पडताळणी केल्यानंतरच अनुदान वितरित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वर्क कोड नाही हप्त्यांवरही ब्रेक

तालुक्यातील अनेक गावांमध्ये घरकुल लाभार्थ्यांचे वर्क कोड जनरेट न झाल्याने मस्टर पेमेंट रखडले असून त्याचा थेट परिणाम पुढील हप्त्यांवर झाला असल्याचा दावा निवेदनात आहे. परिणामी लाभार्थ्यांना रोजगार सेवक संबंधित अधिकारी आणि पंचायत समितीच्या कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचे म्हटले आहे.



तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून प्रलंबित मस्टर आणि घरकुलाचे हप्ते वितरित करावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

अभियंत्यांनी बिल अडवू नये लाचखोरीला थारा देऊ नका

घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर संबंधित अभियंत्यांनी बिल तातडीने सादर करून लाभार्थ्यांना हप्ते वेळेत मिळतील याची दक्षता घ्यावी. पैसे दिले नाहीत म्हणून बिल तयार न करणे किंवा जाणीवपूर्वक दिरंगाई करणे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत असा इशाराही राष्ट्रवादी काँग्रेसने दिला आहे.

घरकुलच्या नावाखाली गरीबांची पिळवणूक थांबवा

पात्र लाभार्थ्यांना न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा कल्याण सपाटे यांचा प्रशासनाला सज्जड दम

घरकुल योजना ही गोरगरीब आणि गरजू कुटुंबांसाठी आधारवड आहे.मात्र सर्वेक्षणातील त्रुटी चुकीच्या नोंदी किंवा तांत्रिक अडचणींच्या नावाखाली पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत असतील तर हा अन्याय कदापि सहन केला जाणार नाही असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे घनसावंगी तालुकाध्यक्ष कल्याण जालिंदरराव सपाटे यांनी दिला.घरकुलाच्या नावाखाली कोणत्याही गरीब लाभार्थ्याकडून पैशांची मागणी होऊ नये. सर्वेक्षणापासून मंजुरीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असावी. अपात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्यांना अपात्रतेचे स्पष्ट कारण सांगून त्रुटी दुरुस्त करण्याची संधी द्यावी अशी मागणी त्यांनी केली.गरीबांच्या हक्काच्या घरकुलावर कुणाचाही डल्ला पडू देणार नाही. प्रशासनाने पात्र लाभार्थ्यांना तातडीने न्याय द्यावा.अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा सपाटे यांनी दिला.

# जिल्हा परिषद धानोरा शाळेचे आदर्श केंद्रीय मुख्याध्यापक श्री.सुनील तरटे यांचा भव्य सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, धानोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श केंद्रीय मुख्याध्यापक श्री. सुनील पंडितराव तरटे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेच्या गौरवार्थ भव्य सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता धानोरा येथील मंगलमूर्ती मंगल कार्यालय, नगर-बीड रोड येथे करण्यात आले होते. भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात झालेल्या या सोहळ्यास शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. सविताताई सुभाष शेळके, सरपंच, धानोरा या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अंकुशराव चव्हाण, माजी सभापती, पंचायत समिती आष्टी, परमेश्वर काका शेळके, माजी पंचायत समिती सदस्य, आष्टी, नामदेव (मामा) शेळके, सामाजिक कार्यकर्ते, संजय नाना गाढवे, माजी चेअरमन, दूध संघ, आष्टी, माजी सरपंच राजाभाऊ शेळके, मनोज शेठ गाढवे, बाळासाहेब निकम, विजय आण्णा गाढवे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पवार, माजी केंद्रप्रमुख पी. वाय. काळे, माजी केंद्रप्रमुख बाबासाहेब झिंजुर्के, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश शेळके, ग्रामपंचायत सदस्य राहुल शेळके, केंद्रप्रमुख जावेद पठाण यांच्यासह स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या., कडाचे संचालक उपस्थित होते.

श्री. सुनील पंडितराव तरटे यांनी आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देतानाच शाळेचा सर्वांगीण विकास, शिक्षकांमध्ये समन्वय, पालकांशी संवाद आणि ग्रामस्थांचा शाळेच्या विकासात सहभाग यासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या कार्यातून शाळा आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेले प्रयत्न आणि शैक्षणिक क्षेत्रातील सेवाभावी योगदान याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचा गौरव केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब बनसोडे यांनी केले. त्यांनी श्री. तरटे सरांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा आढावा घेत त्यांच्या कार्याचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. तसेच त्यांच्या भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी संजय गाढवे, सुरेश पवार, नामदेव मामा शेळके, राजाभाऊ शेळके, पी. वाय. काळे आणि बाबासाहेब झिंजुर्के यांनी मनोगत व्यक्त करून श्री. तरटे यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करत सेवानिवृत्तीनंतरच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी कु. आराध्या गाडे आणि कु. चैत्राली गायकवाड या विद्यार्थिनींनी श्री. तरटे सरांविषयी आपली मनोगते व्यक्त केली. आपल्या शिक्षकांविषयी विद्यार्थिनींनी व्यक्त केलेल्या भावना उपस्थितांना भावूक करून गेल्या. तसेच डॉ. सागर तरटे यांनी आपल्या वडिलांविषयी मनोगत व्यक्त करून त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांच्या वतीने श्रीमती सुनिता झांजे आणि बाळासाहेब महाडिक यांनी मनोगत व्यक्त करून श्री. तरटे सरांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

धानोरा केंद्राच्या वतीने अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते श्री. सुनील पंडितराव तरटे यांचा सपत्नीक शाल, पुष्पगुच्छ व उभा पोशाख देऊन तसेच फेटा परिधान करून भव्य सत्कार करण्यात आला. याशिवाय श्री. तरटे सरांचे अनेक माजी विद्यार्थी, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच तालुक्यातील शिक्षकांनी सेवापूर्ती निमित्त त्यांचा सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक कार्याला सलाम केला.

या गौरव सोहळ्यास आजी-माजी केंद्रप्रमुख, आजी-माजी मुख्याध्यापक, आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका, मित्रपरिवार, आप्तेष्ट, नातेवाईक, शिक्षणप्रेमी नागरिक, हितचिंतक तसेच धानोरा शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, धानोरा केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, धानोरा ग्रामस्थ, महिला भगिनी आणि युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# सळई,सेटिंग प्लेट चोरट्यांसह चोरीचा माल घेणारा भंगार

## व्यावसायिक जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई तब्बल ३ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

जालना शेख फारुक :- बांधकाम साहित्याची चोरी करून ते भंगारात विक्री करणाऱ्या सराईत चोरट्यासह चोरीचा माल खरेदी करणाऱ्याच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. ज्वालासिंग रामसिंग कलाणी वय ४५ रा. गुरुगोविंदसिंगनगर जालना आणि गणेश नारायण कोल्हे वय ३० रा. शिवाजीनगर म्हाडा कॉलनी जालना अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.त्यांच्याकडून चोरीच्या सळई,सेटिंग प्लेट व लोखंडी पाईपांसह तब्बल ३ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.जालना जिल्ह्यातील चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या.त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू केला.

तालुका जालना पोलीस ठाण्यात महासिंग गंगाअप्पा मिटकरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार २९ जुलै रोजी मंठा रोडवरील जनार्दन सिमेंट प्रोडक्ट राममूर्ती शिवारातील प्लॉटवरून १२ हजार रुपये किमतीचे लोखंडी सळईचे तीन बंडल अज्ञात चोरट्यांनी लंपास केले होते.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतही १७ ऑगस्ट रोजी बुऱ्हाणनगर येथील एका खाली प्लॉटवरून ६० हजार रुपये किमतीच्या १२० सेटिंग प्लेट आणि २० हजार रुपये किमतीचे २० लोखंडी पाईप चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती.कबुली नंतर भंगार विक्रेत्यापर्यंत धागादोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू असताना २२ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला चोरीचा माल एमआयडीसी परिसरातील भंगार दुकानात विक्री केल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी ज्वालासिंग कलाणी याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरी केल्याची कबुली देत चोरीचा माल गणेश कोल्हे याला विकल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले.

त्यानंतर पोलिसांनी गणेश कोल्हे यालाही ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीच्या गुन्ह्यातील लोखंडी साहित्य जप्त करण्यात आले.या कारवाईमुळे बांधकाम साहित्य चोरीच्या टोळीचा छडा लागल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. टाटा एससह ३.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त पोलिसांनी आरोपींकडून ३ लाख रुपये किमतीचे टाटा एस वाहन एमएच २१ एक्स २३७९, १२ हजार रुपयांचे तीन लोखंडी सळईचे बंडल, १६ हजार रुपयांच्या ३२ स्लॅबच्या लोखंडी सेटिंग प्लेट आणि २० हजार रुपये किमतीचे २० बांधकामाचे लोखंडी पाईप असा एकूण ३ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पथकाची उल्लेखनीय कामगिरी सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू,अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ,पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अमलदार रमेश राठोड,प्रभाकर वाघ,सागर बाविस्कर,दत्ता वाघुडे इरशाद पटेल,कैलास खार्डे,रमेश काळे,योगेश सहाने,धीरज भोसले,सोपान क्षीरसागर, अशोक जाधवर आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# प्रियदर्शनी अंगणवाडीत पोषण आहाराचा किडकिडाट पालकांमध्ये संताप

## आठ दिवसांत दोनदा धक्कादायक प्रकार आधी शिऱ्यात अळीसदृश जीव आता कडधान्यात काळे भुंगे-किडे आढळल्याचा दावा

जामखेडमधील सर्व अंगणवाड्यांतील धान्यसाठ्याची तातडीने तपासणी करण्याची मागणी

जामखेड विलास बा.जाधव :-

अंबड तालुक्यातील जामखेड येथील माळी गल्लीतील प्रियदर्शनी अंगणवाडी क्रमांक ५ मध्ये बालकांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवघ्या आठ दिवसांपूर्वी तयार केलेल्या शिऱ्यामध्ये अळीसदृश जीव आढळल्याचा पालकांचा दावा असतानाच आता कडधान्याच्या साठ्यात काळे भुंगे व किडे आढळल्याचे सांगण्यात येत आहे. सलग दोन प्रकार समोर आल्याने पालकांमध्ये संतापाचे वातावरण असून बालकांच्या ताटात पोषण आहार की किड्यांचा साठा? असा सवाल उपस्थित केला जात आहे.



प्रियदर्शनी अंगणवाडीतील बालकांना देण्यात येणाऱ्या कडधान्यामध्ये किडे आढळल्याची छायाचित्रे पालकांकडून समोर आणण्यात आली आहेत. बालिका ओवी महेश विधाटे हिचे वडील महेश विधाटे यांनी आहाराची पाहणी करताना हा प्रकार निदर्शनास आल्याचे सांगितले. तसेच बालक शंभू नवनाथ फुटाणे यांचे वडील नवनाथ रमेश फुटाणे यांनीही आहाराच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

आठ दिवसांत दोन घटना प्रशासनाचे लक्ष कुठे?

याच अंगणवाडीत आठ दिवसांपूर्वी शिऱ्यामध्ये अळीसदृश जीव आढळल्याचे पालकांचे म्हणणे आहे. त्या घटनेनंतर संबंधित धान्यसाठ्याची तपासणी करण्यात आली का? त्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले का? उर्वरित साठा वापरण्यास योग्य असल्याची खात्री करण्यात आली का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

आता पुन्हा कडधान्यामध्ये किडे आढळल्याचे सांगण्यात येत असल्याने धान्याच्या गुणवत्तेपासून साठवणूक व्यवस्थेपर्यंत संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. मात्र प्रशासनाच्या अधिकृत तपासणीनंतरच या प्रकारामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

धान्याचा बॅच,पुरवठ्याची तारीख तपासा

बालकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे केवळ अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर दोषारोप करून दुर्लक्ष न करता धान्य पुरवठ्याची संपूर्ण साखळी तपासण्याची मागणी पालकांकडून होत आहे. अंगणवाडीत धान्य कोणत्या स्थितीत पोहोचले त्याचा बॅच क्रमांक काय? पुरवठ्याची तारीख कोणती? पुरवठ्यापूर्वी गुणवत्ता तपासणी झाली होती का? अंगणवाडीत धान्याची साठवणूक योग्य पद्धतीने झाली का? या सर्व बाबींची चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे.सर्व अंगणवाड्यांचे धान्य तपासा

या प्रकारामुळे केवळ एका अंगणवाडीपुरता प्रश्न मर्यादित न ठेवता जामखेड गावातील सर्व अंगणवाड्यांमधील धान्य व कडधान्याच्या साठ्याची विशेष तपासणी मोहीम राबवावी अशी मागणी पालक व नागरिकांनी केली आहे. प्रत्येक अंगणवाडीतील धान्यसाठ्याची स्थिती बॅच क्रमांक पुरवठ्याची तारीख साठवणूक व्यवस्था आणि गुणवत्तेची तपासणी करावी. संशयास्पद साठ्याचे अधिकृत नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्याचा अहवाल पालकांसमोर ठेवावा अशी मागणीही होत आहे.बालकांच्या आरोग्याशी तडजोड नको

नागरिक संदीप सुरेश धुळे म्हणाले अंगणवाडीतील लहान मुलांना शासनाकडून पोषण आहार दिला जातो. आहाराच्या गुणवत्तेबाबत वारंवार प्रश्न निर्माण होत असतील तर प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. जामखेडमधील सर्व अंगणवाड्यांमधील धान्यसाठ्याची तपासणी करून त्याची गुणवत्ता स्पष्ट करावी. बालकांच्या आरोग्याशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड होता कामा नये.प्रशासनाच्या अहवालाकडे लक्ष

दरम्यान प्रियदर्शनी अंगणवाडीतील कडधान्यात किडे आढळल्याचा दावा आणि यापूर्वी शिऱ्यामध्ये अळीसदृश जीव आढळल्याच्या दाव्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. त्यामुळे संबंधित धान्याचे नमुने तपासून वस्तुनिष्ठ अहवाल समोर आणणे गरजेचे आहे. बालकांना सुरक्षित स्वच्छ आणि दर्जेदार पोषण आहार मिळणे हा योजनेचा मूळ उद्देश असताना त्याच आहाराच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल तर प्रशासनाने कागदी तपासणी न करता प्रत्यक्ष धान्यसाठ्याची झाडाझडती घ्यावी अशी संतप्त मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

## भोकरदन नगरपरिषदेत राडारोडा विकास

# वॉर्ड क्र.८ मध्ये नव्या कामात जुन्या विटा-मलब्याचा वापर निकृष्ट कामाविरोधात नागरिक आक्रमक

मुख्याधिकाऱ्यांना जाब तांत्रिक ऑडिटची मागणी सात दिवसांत कारवाई न झाल्यास नगरपरिषदेसमोर आंदोलनाचा इशारा

भोकरदन इसरार खान पठाण :- भोकरदन नगरपरिषदेच्या वॉर्ड क्रमांक ८ मध्ये सुरू असलेल्या नाली व पाईपलाईनच्या कामावरून भ्रष्टाचाराच्या आरोपांनी खळबळ उडाली आहे.नव्या कामासाठी नवीन व दर्जेदार साहित्य वापरण्याऐवजी चक्क जुन्या विटांचे तुकडे दगड आणि रस्त्यावरील मातीचा राडारोडा वापरून काम उरकले जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.या कथित निकृष्ट कामाचे फोटोही तक्रारीसोबत सादर करण्यात आले आहेत.याप्रकरणी वॉर्ड क्रमांक ८ मधील रहिवासी मोबिन पठाण यांनी पदाधिकाऱ्यांसह शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी भोकरदन नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली.या तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी जालना तसेच विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनाही देण्यात आल्या आहेत.पाईपलाईनचे काम की भविष्यातील धोक्याची पायाभरणी तक्रारीनुसार पाईपलाईन टाकताना आवश्यक त्या खोलीपर्यंत खड्डा खोदण्यात आलेला नसून पाईप अतिशय वरच्या स्तरावर टाकण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे भविष्यात वाहनांचा भार पडल्यास पाईप फुटण्याची शक्यता निर्माण होऊ शकते अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.तसेच पाईपच्या खाली आवश्यक असलेला मजबूत काँक्रीटचा बेस न करता थेट मातीवर पाईप टाकण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यानंतर नवीन बांधकाम साहित्य वापरण्याऐवजी जुन्या विटा दगड व मातीचा राडारोडा वापरून काम भरून काढले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विकासकाम की सरकारी निधीचा अपव्यय

नागरिकांच्या आरोपांमुळे या कामाच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. करदात्यांच्या पैशातून होणाऱ्या कामात निकृष्ट साहित्य वापरले जात असेल तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



कामाच्या ठिकाणी मंजूर निधी कामाचा तपशील कंत्राटदाराचे नाव आणि काम पूर्ण करण्याचा कालावधी दर्शविणारा माहिती फलकही लावण्यात आलेला नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे हे काम किती निधीतून मंजूर झाले कंत्राटदार कोण आहे आणि कामाचा दर्जा तपासण्याची जबाबदारी कोणाची याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

मलब्यामुळे नागरिकांची ससेहोलपट

कामाच्या नावाखाली रस्त्यावर पसरलेला राडारोडा माती आणि बांधकाम साहित्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. लहान शाळकरी मुले,महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत असून पावसाळ्यात रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या प्रकरणाची तातडीने स्वतंत्र तांत्रिक पाहणी व तांत्रिक ऑडिट करण्यात यावे कामाचा दर्जा तपासण्यात यावा दोष आढळल्यास संबंधित ठेकेदारासह कामावर देखरेख करणाऱ्या जबाबदार अभियंत्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

तसेच निकृष्ट पद्धतीने केलेले काम पाडून शासकीय नियम व तांत्रिक निकषांनुसार दर्जेदार काम पुन्हा करून घेण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर मोबिन पठाण यांच्यासह बोरसे गुरुजी जिल्हा सचिव,आप,महजाद खान जिल्हा उपाध्यक्ष, फारुक भाई शहर उपाध्यक्ष, भगवान पालकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सात दिवसांची 'डेडलाईन अन्यथा आंदोलनाचा इशारा

दरम्यान या कथित निकृष्ट कामाचा तीव्र निषेध व्यक्त करत शासकीय निधीचा गैरवापर कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही असा इशारा नागरिकांनी दिला आहे. तक्रारीवर सात दिवसांत लेखी व ठोस कारवाई न झाल्यास भोकरदन नगरपरिषद कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आल्याने आता नगरपरिषद प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## श्रावण मासानिमित्त बारसवाडा ते विज्ञानेश्वर आपेगाव पायी दिंडी सोहळा

बारसवाडा पंढरीनाथ माळकरी :- श्रावण मासानिमित्त बारसवाडा येथील हनुमान मारुती मंदिरापासून विज्ञानेश्वर आपेगाव येथे पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यंदाही हा धार्मिक सोहळा उत्साहात पार पडणार असून परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मंदिर समिती व भजनी मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे. सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता बारसवाडा येथील हनुमान मारुती मंदिरापासून दिंडीला प्रारंभ होणार आहे. बारसवाडा येथून निघालेली दिंडी दोदडगाव फाटा खदान मारुती वडीगोद्री अंकुशनगर, समर्थ कारखाना साष्टपिंपळगाव मार्गे विज्ञानेश्वर आपेगाव ता. अंबड येथे पोहोचणार आहे.

दिंडीचे विज्ञानेश्वर आपेगाव येथे रात्री मुक्कामाचे नियोजन करण्यात आले आहे.रात्री ८ वाजता गजानन सुळे व विष्णू महाराज सुळे यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादानंतर रात्री ९ ते १२ या वेळेत भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

या पायी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून पंचक्रोशीतील भाविकांनी वारकरी व भक्तिभावाने सहभागी होऊन दिंडी सोहळ्याची शोभा वाढवावी असे आवाहन बारसवाडा येथील मंदिर समिती व भजनी मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

# मानवलोकच्या विद्यार्थ्यांनी उभारला 'परिवर्तन कट्टा'

## अजय बुरांडे सरांशी सामाजिक प्रश्नांवर संवाद

अंबाजोगाई, दि. २२ ऑगस्ट २०२६ : मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथे द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आयोजनातून 'परिवर्तन कट्टा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कॉम्रेड ॲड. अजय बुरांडे सर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रथम व द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.यावेळी विद्यार्थ्यांशी सामाजिक प्रश्नांवर चर्चा करताना ॲड. अजय बुरांडे यांनी सांगितले की, जेव्हा राज्यसत्ता, धर्मसत्ता आणि उद्योगपती एकत्र येतात, तेव्हा सर्वसामान्य जनता शोषणाला बळी पडते. हे शोषण थांबवण्यासाठी



समाजामध्ये विवेकी व चिकित्सक विचारांची गरज असून, वैचारिक परिवर्तनातूनच सामाजिक परिवर्तन घडवून आणता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.पुढे बोलताना त्यांनी तरुणांच्या भूमिकेवर विशेष भर दिला. समाजात घडणाऱ्या चांगल्या-वाईट बदलांमध्ये तरुणांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यामुळे समाजातील अन्याय, शोषण आणि विषमता यांविरोधात उभे राहण्यासाठी तरुणांनी सजग व संवेदनशील असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

तरुणांनी अधिकाधिक वाचन केले पाहिजे. वाचनातून वैचारिकता निर्माण होते, प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता विकसित होते आणि सामाजिक वास्तवाची जाणीव निर्माण होते. देशाच्या प्रगतीची आणि परिवर्तनाची मोठी जबाबदारी तरुणांच्या खांद्यावर आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या चर्चेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर संवाद साधत आपले विचार मांडले. 'परिवर्तन कट्टा'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन, वैचारिकता, सामाजिक जाणीव आणि परिवर्तनाची भूमिका याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

## अंबाजोगाई तहसीलदारांचा महत्त्वपूर्ण निर्णय, हनुमंत पिंपरी येथे शेतकऱ्याला मिळाला नवीन शेतरस्ता

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे हनुमंत पिंपरी येथील शेतकरी दिगंबर नारायण गिरी यांना त्यांच्या सर्वेनंबर २०/इ मधील शेतात जाण्या -येण्यासाठी अंबाजोगाई तहसील कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ नुसार कायम स्वरूपी शेतरस्ता मंजूर करण्यात आला आहे.

तहसीलदार तथा न्याय दंडाधिकारी श्री. विलास तरंगे यांच्या न्यायालयात या प्रकरणी सुनावणी पूर्ण होऊन हा सकारात्मक निकाल देण्यात आला.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की,

अर्जदार दिगंबर नारायण गिरी यांनी आपल्या शेतात ट्रॅक्टर, बैलगाडी व इतर कृषी अवजारे घेऊन जाण्यासाठी नंबर बांधावरून कायम स्वरूपी रस्ता मिळण्या बाबत अंबाजोगाई तहसील कार्यालयाकडे अर्ज दाखल केला होता.उपविभागीय अधिकारी व तहसीलदार केज यांच्या पत्रांनुसार हे प्रकरण वर्ग करण्यात आले होते.अर्जदार व गैरअर्जदार यांना नोटीस पाठवून प्रत्यक्ष जागेची पाहणी(स्थळ पाहणी)दि.२१ मे २०२६ रोजी करण्यात आली आणि पंचनामा तयार करण्यात आला.

नवीन रस्ता मंजुरीचा निर्णय

शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नवीन शासन निर्णयानुसार दि.२२ मे २०२५ नुसार शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा पूर्ण लाभ मिळण्यासाठी आणि ट्रॅक्टर,हार्वेस्टर यांसारखी मोठी अवजारे सुरक्षित नेण्यासाठी ३ ते ४ मीटर रुंद शेतरस्ते उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.या तरतुदीचा आणि प्रत्यक्ष पंचनाम्याचा आधार घेत तहसीलदारांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

रस्ता मार्ग मौजे हनुमंत पिंपरी सर्व्हे नंबर २० मधील इतर शेतकरी व जमीन सर्व्हे नंबर २५ व २३ मधील शेतकऱ्यांना स.नं.२१, २२ व २३ मधील नंबर बांधावरून व पुढे बोरगाव ते हनुमंत पिंपरी या जुन्या पाणंद रस्त्यावरून मस्साजोग ते बोरगाव या डांबरी रस्त्यापर्यंत रस्ता मंजूर करण्यात आला आहे.

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश मंडळ अधिकारी व ग्राम महसूल



अधिकारी (तलाठी),हनुमंत पिंपरी यांना देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे शेतकरी दिगंबर गिरी यांच्यासह परिसरातील इतर शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा आणि मालवाहतुकीचा मोठा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला असून शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.या प्रकरणी अड.सचिन कुलकर्णी म.पाटोदेकर यांनी शेतकऱ्यांच्या वतीने युक्तिवाद केला होता. त्यामुळे अड.सचिन कुलकर्णी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्वामी समर्थांच्या पावन तिर्थी ज्ञानेश्वरी पारायण व स्वामी समर्थ कथेचा उत्साहात प्रारंभ !

मानूर प्रतिनिधी ह्व

भिऊ नको मी तुझ्या पाठीशी असल्याची ग्वाही देणा-या स्वामी समर्थांच्या पावन नगरीमधे मंगळवार पासुन ज्ञानेश्वरी पारायण फंड सोहळा आयोजीत सामुहिक ज्ञानेश्वरी पारायण आणि स्वामी समर्थांच्या कथेचा उत्साहात प्रारंभ झाला असुन कथा प्रवक्त्या पंढरपुर निवासिनी साध्वी अनुराधा दिदीच्या रसाळ आणि मधाळ वाणीतून कथा श्रवणसुखाची अनुभूती बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविक घेत आहेत .

ज्ञानेश्वरी पारायण फंड सोहळा या नावांने धर्मकार्याबरोबर समाज संघटीत व सुसंस्कृत व्हावा या उद्देशाने ही संस्था कार्य करत असुन वर्षभरातून दोन वेळा समाधी सोहळ्याचे औचित्य साधून श्रीक्षेत्र आळंदी येथे दुसरा कार्यक्रम फिरता सप्ताह महाराष्ट्र व बाहेर राज्यातील तिर्थक्षेत्रात केला जात असतो ,यावर्षी हा सोहळा अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या सानिध्यात सुरू असुन स्वामी समर्थांच्याच कथेचे आयोजन केले असुन भागवताचार्या साध्वी अनुराधा दिदी या कथेचे अंतरंग आपल्या ओघवती वाणीतून भाविकांच्या गळी उतरवत आहे .

येणाऱ्या सर्व भाविकांची निवास व भोजन प्रसादाची व्यवस्था असुन यासाठी सुत्रबध्द नियोजन केले आहे .

ज्ञानेश्वरी पारायण व्यासपिठ !

सामुहिक ज्ञानेश्वरी पारायणाची व्यासपिठ चालकाची जबाबदारी भागवताचार्य विनायक महाराज अष्टेकर (संभाजीनगर ( ,कमलताई दहातोंडे (परळी ) उज्वलाताई अंदूरे (जालना ) हे सांभाळत आहे .प्रथम कीर्तन पुष्प प्रज्ञाचक्षु मुकुंदकाका यांचे चिरंजिव गोविंद महाराज यांनी स्वामीचे हे देणे ,तेणे पावलो दरूषणे या अभंगावर विवेचन करून समर्पित केले ,कमलताई दहातोंडे ,विनायक महाराज ,चंदाताई महाराज ,भरत महाराज ,भागवत महाराज , शाम महाराज यशोधन महाराज साखरे यांची कीर्तनसेवा होणार आहे .

सोहळा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अरूणजी वेळापुरे (माजलगाव ) श्रीकांत नाना इटकर (लातुर ) यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजी काटकर ,महारूद्र विर ,अणिलजी शेटे (बीड ) शिवराज अंदोले ,अजय टंकसाळे ,महेश भिवरे , संजय डांगरे , ढोके प्रकाश सासवडे दत्तात्रय तांबट आदी सदस्य परिश्रम घेत आहेत .



बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभरातून भाविक सहभागी !

## कु.गीतांजली महादेव दळवे हिचे नेत्र चिकित्सक मधील ऑप्टोमेट्रीव्हिज्युअल सायन पदवी परीक्षेत यश,शिक्षण संपताच मिळवली नोकरी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील मूळरहिवासी असलेली दैनिक दिव्य लोकप्रभा चे केज तालुका प्रतिनिधी महादेव दळवे यांची कन्या कु. गीतांजली महादेव दळवे हिने पहिल्याच प्रयत्नात नेत्र चिकित्सक मधील महत्वाची ऑटोमॅटिक अँड व्हिजन सायन्स ही पदवी संपादन केली गीतांजलीचे प्राथमिक शिक्षण केज येथील विवेकानंद विद्यामंदिर या शाळेत



झाले तर माध्यमिक शिक्षण वसंत महाविद्यालय केज येथे झाले बारावी सायन्स नंतर डॉ.डी. वाय पाटील ऑटोमेट्री सायन्स पुणे महाविद्यालयात प्रवेश मिळवून ही पदवी प्राप्त केली. उल्लेखनीय म्हणजे शिक्षण संपताच तिला रिलायन्स उद्योग समूहात चांगल्या हुद्द्यावर नोकरीची संधी उपलब्ध झाली.

तिच्या या यशाचे श्रेय आई वडील,भाऊ, शिक्षक व दळवे परिवार चिंचोली माळी यांना देते.तिच्या या यशाबद्दल लवकरच पत्रकार बांधवाकडून सत्कार करण्याचे नियोजन केले आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## माजलगाव शहरात प्रथमच वन डे लुक अँड लर्न सेमिनारचे आयोजन

# मराठी चित्रपट प्रसिद्ध सिनेतारिका किशोरी शहाणे यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्राचे वितरण

माजलगाव / प्रतिनिधी

दि.२१ माजलगाव शहरांमध्ये प्रथमच वन डे लुक अँड लर्न सेमिनारचे आयोजन प्रिया ब्युटी पार्लर अँड मेकअप स्टुडिओ केसापुरी कॅम्प यांच्यावतीने सौभाग्य मंगल कार्यालय केसापुरी कॅम्प या ठिकाणी भव्य दिव्य असे आयोजन करण्यात आले होते. सौंदर्य, फॅशन व मेकअप क्षेत्रात नवीन संधी आणि बदलत्या ट्रेंड विषयी मार्गदर्शन या सेमिनारच्या माध्यमातून करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील व तालुक्यातील सौंदर्य, फॅशन व मेकअप क्षेत्रातील विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता.

या कार्यक्रमास मराठी चित्रपट प्रसिद्ध सिनेतारिका किशोरी शहाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असल्याने त्यांच्या या उपस्थिती मुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या किशोरी शहाणे यांनी या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या व सहभागी झालेल्या विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्षेत्र कुठलेही असो जिद्द, चिकाटी, मेहनत, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर माणसाला उत्तम करिअर करता येते.

या आयोजित सेमिनार मध्ये विविध उपक्रम व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या मराठी चित्रपट सिनेतारिका किशोरी शहाणे व आयोजक प्रिया डोंगरे मॅडम यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

माजलगाव शहरांमध्ये प्रथमच आशा प्रकारच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आल्याने फॅशन, सौंदर्य, व मेकअप क्षेत्रातील विद्यार्थी प्रशिक्षणार्थी व महिला मध्ये उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले. आयोजकाच्या या उपक्रमांचे उपस्थितांकडुन भरभरून कौतुक करण्यात आले.

हा कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याकरिता प्रिया ब्युटी पार्लर अँड



मेकअप स्टुडिओ केसापुरी कॅम्प च्या प्रिया डोंगरे (मॅडम) तसेच त्यांच्या सहकारी महिला टीमने अथक परिश्रम घेत हा कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

# ऊसाला ६००० रुपये प्रतिटन दर जाहीर करा

## अन्यथा तीव्र आंदोलन - जागर प्रतिष्ठानचा इशारा

माजलगाव : साखरेच्या वाढत्या दराच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळावा, यासाठी ऊसाला ६ हजार रुपये प्रतिटन दर जाहीर करावा, अशी मागणी जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याने केली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

साखरेच्या दरात वाढ होत असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ झाली आहे. मात्र शेतकऱ्यांना मिळणारा ऊसदर त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. केंद्र सरकारने २०२६-२७ हंगामासाठी १०.२५ टक्के साखर उताऱ्याच्या आधारावर एफआरपी ३६५ रुपये प्रतिक्विंटल, म्हणजेच ३६५० रुपये प्रतिटन, निश्चित केली आहे.दरम्यान, काही साखर कारखान्यांनी एफआरपीपेक्षा अधिक दर जाहीर केल्याचेही समोर आले आहे. सोमेश्वर साखर कारखान्याने २०२५-२६ हंगामासाठी ३८०० रुपये प्रतिटन अंतिम दर जाहीर केला असून काही शेतकऱ्यांना अनुदानासह ३९०० ते ४००० रुपये प्रतिटन दर मिळणार असल्याचे वृत्त आहे.

या पार्श्वभूमीवर साखरेचे दर वाढत असताना त्याचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही मिळाला पाहिजे, अशी भूमिका जागर प्रतिष्ठानने घेतली आहे. ऊस उत्पादकांच्या कष्टाचा आणि वाढलेल्या उत्पादन खर्चाचा विचार करून शासनाने ऊसाला ६ हजार रुपये प्रतिटन दर जाहीर करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काचा दर मिळालाच पाहिजे. ऊसाला ६ हजार रुपये प्रतिटन दर जाहीर न केल्यास जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा जागर प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन ऊस उत्पादकांना न्याय द्यावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

## सातेफळ शिवारातून ९ लाखांचे ट्रान्सफॉर्मर साहित्य लंपास; अज्ञात चोरावर गुन्हा दाखल

अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा)

शेतात इंडस टँक कंपनीच्या कामासाठी आणून ठेवलेल्या ६३० केव्ही क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरचे (डीपी) नटबोल्ट उघडून त्यातील चार कॉईल आणि १२०० लिटर ऑईल असा तब्बल ८ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सातेफळ येथील मूळ रहिवासी व सध्या शिक्षक कॉलनी अंबाजोगाई येथे वास्तव्यास असलेले व्यावसायिक विकास दौलतराव कि त (वय ४४ वर्षे) यांनी सातेफळ शिवारातील शेत सर्व्हे नंबर ११८ मध्ये इंडस टँक कंपनीचे काम सुरू केले आहे. या कामासाठी त्यांनी एक महिन्यापूर्वी ट्रान्सफॉर्मर आणून शेतात ठेवला होता. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास काम संपवून ते अंबाजोगाई येथे निघून गेले.

दरम्यान, १७ ऑगस्ट रोजी सकाळी डीपीमधील साहित्य चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. विकास किर्दत यांनी शेतात जाऊन पाहणी केली असता ट्रान्सफॉर्मरचे नटबोल्ट खोलून साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे दिसले. अज्ञात चोरट्यांनी ६ लाख ४० हजार रुपये किमतीच्या चार कॉईल आणि २ लाख ४० हजार रुपये किमतीचे १२०० लिटर ऑईल असा एकूण ८ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता.या प्रकरणी विकास दौलतराव किर्दत यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जसवंत शेप करत आहेत.

# कै. वसंतराव चव्हाण यांच्या स्मृतिनिमित्त नायगावात २६ ऑगस्ट रोजी भव्य कीर्तन सोहळा


## प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे यांचे कीर्तन

नायगाव, प्रतिनिधी :

लोकनेते तथा माजी खासदार कै. वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त नायगाव (बा.) येथे भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता समाधी पूजन त्या नंतर १० ते १२ या वेळेत वसंत स्मृती कृषी महाविद्यालयाच्या लालवंडी रोड नायगाव बा. परिसरात हा सोहळा होणार आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार युवाकीर्तीवीर ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे यांचे हरिनामाचे कीर्तन यावेळी होणार असून, त्यांच्या ओघवत्या वाणीतून अध्यात्मासोबतच सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. कीर्तनाच्या माध्यमातून लोकनेते कै. वसंतराव चव्हाण यांच्या सेवाभावी कार्याला व जनसेवेला अभिवादन करण्यात येणार आहे.

कै. वसंतराव चव्हाण यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. साधेपणा, माणुसकी, जनसामान्यांशी असलेली आपुलकी आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कार्यपद्धती यामुळे त्यांनी जनमानसात अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



पंचक्रोशीतील गायक, वादक, भजनी मंडळे तसेच जिल्हाभरातून येणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन खा. रविंद्र वसंतराव चव्हाण,व चव्हाण परिवार तसेच समस्त गावकरी मंडळी, नायगाव (बा.) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कीर्तन सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी कृषी महाविद्यालय येथील वसंत स्मृती स्थळी शनिवारी दुपारी एक वा खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. जिल्हाभरातून येणारे भाविक, नागरिक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लक्षात घेऊन आसन व्यवस्था, पार्किंग, स्वागत, भोजन व इतर नियोजनासाठी विविध समित्या गठित करून जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

बैठकीचे प्रास्ताविक उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण यांनी केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे व कापड व्यापारी सचिन सावकार चिद्रावार यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना खा. रविंद्र चव्हाण म्हणाले, 'माझा चव्हाण परिवार म्हणजे सर्व नायगावकर आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम आपला स्वतःचा कार्यक्रम समजून प्रत्येकाने सहभागी होऊन तो यशस्वी करावा,' असे आवाहन त्यांनी केले. बैठकीस केशव पाटील चव्हाण, माधव आप्पा बेळगे, वसंत सावकार मेडेवार,प्राचार्य रमेश लव्हेकर ,सुरेश पा. कल्याण, हणमंत पा. चव्हाण, आनंदराव पा. चव्हाण, श्रीनिवास पा. चव्हाण, सुधाकर पा. शिंदे यांच्यासह मान्यवर व्यापारी, पत्रकार, नगरसेवक, तसेच वसंत चव्हाण मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

भक्ती, हरिनाम, प्रबोधन आणि महाप्रसादाचा हा सोहळा कै. वसंतराव चव्हाण यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याबरोबरच त्यांच्या जनसेवेचा वारसा पुढे नेणारा प्रेरणादायी उपक्रम असून या विषयावर एक चित्रफित यावेळी दाखवण्यात येणार आहे.अशी माहिती संचलन करते बालाजी शिंदे यांनी दिली.आभार मित्र मंडळाचे सचिव संजय आपा बेळगे यांनी मानले.

## डॉ.कविता गित्ते (कराड) यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार हा बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण! - पंकजाताई मुंडे

केज/प्रतिनिधी

केज येथील सानेगुरुजी निवासी प्राथमिक, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांना केंद्र सरकारचा मानाचा 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६'जाहीर झाला आहे.येत्या ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) रोजी नवी दिल्ली येथे भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी त्यांनी केलेले कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे.श्रीमती कविता गित्ते कराड मॅडमच्या या यशाने बीड जिल्ह्याची मान पुन्हा एकदा उंचावली आहे.

श्रीमती कविता गित्ते कराड ताई यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! अशा शब्दात पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी



शुभेच्छा दिल्या आहेत.

केज येथील सानेगुरुजी निवासी प्राथमिक, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांना केंद्र सरकारचा मानाचा 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६'जाहीर झाला आहे.

## निमगांव शिवारात शॉर्टसर्किटमुळे गोठ्याला आग तीन जनावरे जळून खाक

अर्धापूर (प्रतिनिधी): तालुक्यातील निमगांव शिवारातील शेतातील गोठ्याला विद्युत शॉर्टसर्किटमूळे आग लागून गोठ्यात बांधलेली गाय, म्हैस आणि एक कालवड अशी तीन जनावरांचा होरपळून मृत्यू झाला. तर गोठ्यात ठेवलेली रासायनिक खतांची पोते आणि गहु-ज्वारीच्या पोत्यासह नांगर, कडबाकुट्टी,शेतीचे लाकडी अवजारे आदी साहित्य जळून खाक झाले आहेत. ही घटना दि. २१ ऑगस्ट रोजी रात्री घडली असून शनिवारी सकाळी उघडकीस आली आहे. या जळीत घटनेत शेतकऱ्यांचे अंदाजे दोन लाखाचे नुकसान झाले आहे. निमगांव येथील उपसरपंच वसंतराव रामधन चव्हाण यांच्या शेत गट नं. १९ मध्ये जनावरांचा गोठा आहे. या गोठ्यावरुन ३३ के. व्ही. विद्युत तारा गेलेल्या आहेत. झाडाच्या फांद्या या विद्युत तारेमधून अचानक शॉर्टसर्किट होवून गवती छप्पर असलेल्या त्या जनावरांच्या गोठ्यावर अग्नीच्या ज्वाला पडून गोठ्याला आग लागली असावी असा अंदाज वर्तविल्या जात आहे. या आगीत जनावरांचा गोठा पुर्णत: जळून खाक झाला असून गोठ्यातील एक गाय, कालवड आणि एक म्हैस होरपळून मृत्यू झाले आहेत. तर गोठ्यात ठेवलेली रासायनिक खतांची पोते, धान्य, नांगर, कडबाकुट्टी,शेतीचे लाकडी अवजारे आदी जळून खाक होवून अंदाजे अडीच ते तीन लाखाचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार रेणूकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब



### पशुधनासह शेतातील साहित्य खते जळून खाक

तहसीलदार राजेंद्र शिंदे, मंडळ अधिकारी नवीन रेड्डी, महसूल अधिकारी बालाजी वसमतकर, पशुवैद्यकीय अधिकारी मनाठा जि.एम.शेख, पशुवैद्यकीय अधिकारी चाभरा एस.एस.क-हाळे यांनी मयत जनावरांचे उतरिय तपासणी करुन नियमानुसार कारवाई केली. यावेळी भाजप नेते आनंदराव भंडारे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सुधाकर कदम, भाजप जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव भालेराव, पोलीस पाटील कान्होजी मोळके, पोलीस पाटील छगनराव इंगळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष गोविंदराव टेकाळे, भाजप अनु. जाती मोर्चा माजी तालुकाध्यक्ष देवराव कांबळे आदींनी भेट देवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अर्थिक मदत मिळण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली.

## मुदखेड मराठी पत्रकार परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी दिनेश शर्मा यांची निवड

मुदखेड /प्रतिनिधी

नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघानी जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणी निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू केली असून मराठी पत्रकार परिषदेच्या मुदखेड तालुका कार्यकारिणीची निवड गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह, मुदखेड येथे पार पडली.जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी मुदखेड तालुका कार्यकारणीच्या निवडीबाबत दिलेल्या सूचनेवरून जिल्हा संघटक संजय कोलते व जिल्हा सहसचिव ईश्वर पिनलवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या तालुकाध्यक्षपदी दिनेश शर्मा यांची निवड करण्यात आली.

यावेळी तालुका उपाध्यक्षपदी शेख इरफान, तालुका सचिवपदी संतोष सावंत,सहसचिव अमोल टेकले,तर तालुका कोषाध्यक्षपदी हाफिज कुरेशी यांची निवड करण्यात आली.

मुदखेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या या बैठकीस पत्रकार परिषदेचे पदाधिकारी व तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त अध्यक्ष एस एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर तसेच पत्रकार परिषदेच्या माध्यमातून भविष्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर यावेळी चर्चा



करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवर व पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले. पत्रकारांच्या समस्या शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी तसेच पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रतापराव देशमुख,गंगाधर डांगे,देवानंद गूंजाळ,शेख अजगर हुसैन, नामदेव राहेरे, जयराम वने श्रीकांत देशमुख,शेख इमाम साब,साहेबराव हौसरे,सिद्धार्थ चौदंते,अतीक अहेमद,कुणाल चौधरी, रुखमाजी शिंदे,साहेबराव गागलवाड,ऊत्तम हनुमंते, अब्दुल रजाक,प्रल्हाद मसके,धम्मदाता कांबळे, किशोर पिल्लेवाड,पुंडलिक वच्चेवार,शिवाजी एडके,आशिष कल्याने,अब्दुल रज्जाक,व्यंकटी मुंगल,संतोष दर्शनवाड,शेख शमशोद्दिन,म.हकीम,शेख जब्बार,राहुल कोलते,आदी पत्रकारांची उपस्थिती होती.

मान्यवरांकडून अभिनंदन....

सर्व नूतन पदाधिकारी यांचे मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश कांबळे,जिल्हा अध्यक्ष संतोष पांडागळे ,लातूर विभाग अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष विजय जोशी,मराठी पत्रकार परिषदेचे माजी सरचिटणीस चारुदत्त चौधरी,मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष एड.प्रदीप नागापुरकर,गोवर्धन बियाणी ,कार्याध्यक्ष अनिल कसबे,सरचिटणीस अनुराग पोवळे,डिजिटल मीडिया सेलचे जिल्हा अध्यक्ष शेख मुजीब,महानगराध्यक्ष रवी संगनवार,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक राम तरटे यांनी अभिनंदन केले.



## सर्पदंशनाने संदीप चव्हाण यांचे निधन

अर्धापूर (प्रतिनिधी) तालुक्यातील निमगाव येथील संदीप केशर चव्हाण (वय३८वर्ष) हे दि. २१ शुक्रवारी रोजी आपल्या शेतातील कामकाज करून वसमत फाटा येथील स्वराज पेट्रोल पंपावर दहा वर्षापासून पेट्रोल भरण्याची काम करतो नेहमीप्रमाणे काम करीत असताना सायंकाळच्या सुमारास त्याची प्रकृती बिघडल्यामुळे पेट्रोल पंपावर आराम करीत असताना सर्पदंशन झाले असल्यामुळे उपचारासाठी अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते.उपचार सुरू असताना निधन झाले आहे. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास जमादार संजय घोरपडे हे करीत आहेत.